नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १९७ * * अकोला * | सोमवार, दिनांक १९ जानेवारी २०२६ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## इंडिगोच्या विमानात बॉम्बच्या धमकीने खळबळ

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १८ :

दिल्लीहून पश्चिम बंगालमधील बागडोगरा येथे जाणाऱ्या इंडिगोच्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्याने मोठी खळबळ उडाली. वैमानिकांनी तातडीने लखनौच्या चौधरी चरण सिंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानाचे आपत्कालीन लँडिंग केले. सुदैवाने, या घटनेत सर्व २३० प्रवासी आणि ७ क्रू मेंबर्स सुरक्षित आहेत.

इंडिगोचे फ्लाईट ६ई-६६५० सकाळी ७:४६ वाजता दिल्लीहून बागडोगरासाठी रवाना झाले होते. विमान हवेत असतानाच एका प्रवाशाला विमानातील वॉशरुममध्ये एक टिशू पेपर सापडला. या टिशू पेपरवर हाताने विमानात बॉम्ब आहे असा संदेश लिहिलेला होता.

# सेवकांनो सेवा करा!




आपल्या महाराष्ट्रात अनेक वर्षापासून महानगर पालिका, नगर पालिका, नगरपरिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या नाही. त्याची वेगवेगळी करणे आहेत, मात्र जो निर्णय सदस्य, नगराध्यक्ष किंवा महापौर यांच्याद्वारे होत होता. तसेच अनेक निर्णय संबंधित नगरपरिषद महापालिका नगरपालिकांचे प्रशासक या निवडणुका न झाल्यामुळे घेत होते. म्हणजे, प्रशासक जो त्या शहराचा निवासी नाही त्याच्या हाती सर्व कारभार होता. आता शहर विभागांमध्ये निवडणुका झाल्या त्यामुळे शहरांमधील लोकप्रतिनिधी म्हणजेच नगरसेवक निवडून आलेले आहेत. आम्ही परवा मुंबईच्या निकालाची चर्चा या स्तंभात केली. आता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभाराबाबत विचार केला पाहिजे. विकासाचे नियोजन करण्याची जबाबदारी १९९२ मधील ७४ व्या घटनादुरुस्तीद्वारे करण्यात आली आहे. त्याप्रमाणे नगर पालिका आणि महानगर पालिकांना संपूर्ण अधिकार बहाल केलेले आहेत. पण निवडणुकाच नाहीत त्यामुळे एकटा प्रशासक शासक बनला होता. निवडून येण्यासाठी तळमळ करणारे लोकप्रतिनिधी निवडणुकांबाबत साशंक होते. यामुळेच की काय मुंबईसारख्या शहरात लोकप्रतिनिधी असताना मुंबई महानगर पालिकेच्या जवळजवळ ९० हजार कोटींच्या वर ठेवी होत्या, त्या आता ब?याच खाली आल्या आहेत. नगरपालिकेचे किंवा महानगरपालिकेचे सदस्य थेट जनतेकडून मतदानाद्वारे निवडून आलेले असतात. या ठिकाणी प्रभाग किंवा वार्ड नामक छोटे छोटे मतदार संघ असतात. असे मतदारसंघ इतर निवडणुकीतील मतदार संघापेक्षा लहान असल्याने तेथील लोकप्रतिनिधी स्थानिक प्रश्नांबाबत जागृत असतात आणि समस्या सोडवण्यासाठी तत्पर आणि वाकबगार असतात. त्यांच्या हाती आता कारभार आल्यामुळे काही दोष वगळता सामान्य जनतेला दिलासा मिळू शकेल यात शंका नाही. साधे नाशिकचेच उदाहरण घ्या, तेथे प्रशासकाने सुमारे १८०० पेक्षा जास्त जुने वृक्ष कापण्याचा जो निर्णय घेतला होता, त्याला राष्ट्रीय हरित लवादाने स्थगिती दिल्यामुळे ती झाडे वाचली. जर लोक प्रतिनिधींनी असा चुकीचा निर्णय घेतला तर ते जनतेत लोकप्रिय राहत नाहीत. उलट अलोकप्रिय होऊ शकतात त्यामुळे ते असा निर्णय घेऊ शकत नाहीत. आता वर्षानुवर्षे लाल फीतशाहीत अडकलेल्या विकासाला निवडून आलेले हे जनसेवक गतिमान करतील काय हाच खरा प्रश्न आहे. विकास कामे करणा?या अनेक कंत्राट दारांबरोबर आमची अनेक वेळा चर्चा होते, त्यात काही अव्यवहारवादी नगरसेवक वगळता इतरांना टक्केवारी द्यावी लागतेच, खरेतर हे उघड सत्य आहे. पण ती समस्याला बाजूला ठेवून 'तळे राखील तो पाणी चाखील' या न्यायाने निदान त्या तळ्याचे शुद्धीकरण आणि जतन होत असेल असेच म्हटले पाहिजे. आता आज आपल्या राज्यातील अनेक नगरांमध्ये पाणीबाणी आहे, तिथे टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागतो. पाणी वितरणाची इंदोरी स्टाईल आपल्या राज्यात उघड झाली नसली तरी आपल्याला मिळणारे पिण्याचे पाणी शुद्धच आहे याची खात्री किंवा हमी कोण देणार. नगरसेवक असला तर त्याच्याकडे बोट दाखवता येते, जाब विचारता येतो. म्हणूनच कितीही दोष असले तरी निवडून आलेले जनसेवक बऱ्याच अंशी जन अपेक्षा पूर्ण करतात, कारण ते त्यांचे कर्तव्य असते. सध्या महाराष्ट्रातील अनेक शहरे खड्डेयुक्त आहेत. काही ठिकाणी रस्त्यात मोठमोठे खड्डे आहेत तर काही ठिकाणी खड्ड्यांमध्येच रस्ते आहेत. उदाहरण द्यायचेच असेल तर घोडबंदर परिसरातील अनेक रस्त्यांचे आणि तेथील तुंबलेल्या वाहतुकीचे सहज देता येईल. शहरातील वाहतूक कोंडी हा आजचा आणि भविष्य काळातील महत्त्वाचा मुद्दा आहे. खोदलेले रस्ते लवकरात लवकर चालू लागले तरी बऱ्याच अंशी सुधार होऊ शकतो. त्यानंतर सर्वात महत्त्वाचा प्रश्न आपल्या शहरातील कच?याचा आहे. या कच?याचा निचरा करण्याची शक्ती कोणातही नाही हे खरे असले तरी त्यामुळे रोगराई पसरते हे मान्यच केले पाहिजे. लोकांना अधिक सेवा देण्याच्या आमिषाखाली नागपूर सारख्या शहरात २४ तास पिण्याचे पाणी पुरवण्यात येते. या पिण्याच्या पाण्याचा सध्या सर्रासपणे बेसुमार दुरुपयोग होत आहे, हे कुठेतरी थांबले पाहिजे. शहरातील उद्याने, सार्वजनिक शौचालये, पायवाटा म्हणजे फुटपाथ आणि फुटपाथ वरील धंदे यांचे नियोजन करणेही गरजेचे आहे. अनेक नगरसेवक बऱ्याच वर्षांपासून सेवा न करता आल्याने उपाशी आहेत. तीच परिस्थिती जनतेची आहे कारण या जनतेच्या शहरांचा विकासही उपाशी आहे असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. आता नगरसेवकांना काम करण्याची संधी मिळाली आहे त्यांनी निदान पुढील काही वर्ष तरी गीता संदेशाप्रमाणे, 'निष्काम कर्मयोग' आचरणात आणावा आणि आम्ही वर वर्णन केलेल्या समस्या अंक गणिताच्या त्रैराशिकाप्रमाणे सोडवून योग्य उत्तर मांडावे इतकीच आमची इच्छा आहे. म्हणूनच आमचा सल्ला आहे, सेवकांनो सेवा करा!

[signature]
mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

### शिंदेसेनेचे नगरसेवक ठाकरे गटाच्या संपर्कात : 'मातोश्री'वर फोनाफोनी?

# पडद्यामागे जोरदार हालचाली



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला यश मिळाले असले, तरी काठावरचे बहुमत मिळाले आहे. त्यामुळे मुंबईचा महापौर कोणाचा होणार? यावरून कमालीची गुप्तता आणि रस्सीखेच आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खबरदारीचा उपाय म्हणून आपल्या सर्व २९ नगरसेवकांना वांद्रे येथील 'ताज लँड्स एन्ड' या पंचतारांकित हॉटेलमध्ये हलवले आहे. भाजप नेते देवेंद्र फडणवीस सध्या दावोस दौऱ्यावर असताना मुंबईत मोठा 'दगाफटका' होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

याचदरम्यान, एकनाथ शिंदेंचे काही नगरसेवक ठाकरे गटाच्या संपर्कात असल्याची माहिती समोर आली आहे. यावरून मुंबईच्या राजकारणात पुन्हा उलथापालथ होणार का? याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

बीएमसी निवडणुकीत भाजपने ८९ जागांवर विजय मिळवला असून, त्यांना ११४ हा बहुमताचा आकडा गाठण्यासाठी शिंदे गटाच्या २९ नगरसेवकांची मदत अनिवार्य आहे.

हीच संधी साधून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून भाजपसमोर अडीच-अडीच वर्षांच्या महापौरपदाचा प्रस्ताव ठेवला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यातच "जर देवाची इच्छा असेल तर मुंबईचा पुढचा महापौर आपलाच असेल," असे सूचक वक्तव्य उद्धव ठाकरे यांनी करून राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या या विधानामागे अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

वृत्तानुसार, शिंदे गटाचे काही नवनिर्वाचित नगरसेवक उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. या नगरसेवकांनी उद्धव ठाकरे यांच्या अत्यंत विश्वासू व्यक्तीला फोन करून, "आमच्या मनात उद्धवजी आणि आदित्य ठाकरे यांच्याबद्दल कोणतेही वैर नाही," असे स्पष्ट केल्याचे समजते.

या गुप्त वाटाघाटींची कुणकुण लागताच उपमुख्यमंत्री शिंदेंनी तातडीने आपल्या नगरसेवकांची रवानगी हॉटेलमध्ये केली असून, महापौर निवडीपर्यंत त्यांना तिथेच ठेवले जाणार आहे.

दरम्यान, खासदार संजय राऊत यांनी देखील आजच्या पत्रकार परिषदेत अनेक सूचक विधाने केली आहेत. ते म्हणाले, "मुंबईचा महापौर शिवसेनेचा किंवा ठाकरे बंधुंचा व्हावा, यापेक्षा भाजपचा होऊ नये ही सगळ्यांची भावना आहे. अनेकांशी चर्चा सुरू आहे. आम्ही सध्या तटस्थपणे या सगळ्या हालचालींकडे पाहत आहोत, पण पडद्यामागे बऱ्याच गोष्टी घडत आहे," असा दावा संजय राऊत यांनी केला असून, मुंबईत हालचाली वाढल्या आहेत.

## ज्येष्ठ नेते, माजी मंत्री राज के. पुरोहित यांचे निधन

भाजपचा अभ्यासू चेहरा हरपला



■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १८ :

मुंबई भाजपचे माजी प्रदेशाध्यक्ष, माजी मंत्री आणि दक्षिण मुंबईतील प्रभावशाली नेते राज के. पुरोहित (७१) यांचे आज मुंबईतील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील एक अभ्यासू, अनुभवी आणि सर्वसामान्यांशी नाळ जोडलेला नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे.

राज के. पुरोहित हे मुंबई भाजपमधील एक सामर्थ्यशाली नाव होते. विशेषतः दक्षिण मुंबईत त्यांचा मोठा राजकीय दबदबा होता. मुंबईतील उत्तर भारतीय समुदायाचे नेतृत्व म्हणून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. विधिमंडळातील त्यांचा अभ्यास आणि प्रशासनावरील पकड यामुळे त्यांनी राज्य सरकारमध्ये मंत्रीपदही भूषविले होते. मुंबई भाजपचे अध्यक्ष म्हणून त्यांनी पक्षाची संघटनात्मक बांधणी अत्यंत मजबूत केली होती.

## अपघातात ५ मित्रांचा जागीच मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. १८ :

अक्कलकोट येथे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या कारला भीषण अपघात झाला असून, यामध्ये ५ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. मोहोळ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील देवडी पाटीजवळ रात्री साडेअकराच्या सुमारास हा अपघात घडला.

पनवेल (जि. रायगड) येथून सहा मित्र एर्टिगा कारने अक्कलकोट येथे देवदर्शनासाठी निघाले होते. ही कार मोहोळ जवळील देवडी पाटी परिसरात आली असता, चालकाचा वाहनावरील ताबा अचानक सुटला. भरधाव वेगातील ही कार महामार्गापासून सुमारे १० ते १५ फूट दूर झुडपांमध्ये जाऊन एका मोठ्या झाडावर जोरात आदळली.

हा अपघात एवढा भीषण होता की, कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे. धडकेचा आवाज ऐकून आसपासच्या नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. कारमध्ये ३ पुरुष आणि ३ महिला असे एकूण ६ प्रवासी होते. यापैकी ५ जणांचा जागीच मृत्यू झाला असून त्यांचे मृतदेह वाहनामध्ये पूर्णतः अडकलेल्या अवस्थेत होते. या अपघातातून ज्योती जयदास टाकले (रा. सेक्टर ७, पनवेल) या महिला सुदैवाने बचावल्या आहेत.

## वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमसाठी मुख्यमंत्री फडणवीस दावोसला



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.१८ :

महाराष्ट्राला १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्याचा वेग अधिक वाढवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम मध्ये सहभागी होण्यासाठी दावोस, स्वित्झर्लंडकडे रवाना झाले आहेत. या परिषदेसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासमवेत उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत तसेच प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

जागतिक व्यासपीठावर भारताचे विकास इंजिन म्हणून 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' अधिक बळकट करण्याचा निर्धार असून जग या नव्या महा-ग्रोथ गाथेकडे अपेक्षेने पाहत आहे. महाराष्ट्राची १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल अधिक वेगवान करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे फडणवीस यावेळी म्हणाले. गेल्यावर्षी १६ लाख कोटींचे गुंतवणूक करार महाराष्ट्राने केले होते. यावर्षी अधिक गुंतवणूक आणण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारने ठेवले आहे.

### महाराष्ट्र राज्यगीताच्या प्रेरणादायी सुरांनी

# दुमदुमली ज्युरिकची भूमी



■ वृत्तसंस्था, ज्युरिक, दि. १८ :

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचे वर्ल्ड इकोनॉमिक फोरमसाठी आज ज्युरिक येथे आगमन झाले.

या दौऱ्यासाठी येताच मराठमोळ्या पद्धतीने त्यांचे उत्स्फूर्त पद्धतीने स्वागत करण्यात आले. पारंपरिक वेश, पारंपरिक पद्धती आणि पारंपारिक उत्साहात मराठीजनांनी केलेल्या स्वागताबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. महाराष्ट्राचे राज्यगीत सुद्धा यावेळी सादर झाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आज दावोस येथे आगमन होताच मराठी भाषिक नागरिकांनी त्यांचे मराठमोळ्या पद्धतीने ओवाळून स्वागत केले. स्वित्झर्लंडमधील भारताचे राजदूत मृदुलकुमार यांनी देवेंद्र फडणवीस यांचे प्रारंभी स्वागत केले. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी आणि किंजारापू राम मोहन नायडू यांनीही देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

मार्गात आणि इतरही नागरिकांनी त्यांची भेट घेतली तेव्हा प्रत्येक जण महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या महापालिका निवडणुकीत मिळालेल्या दणदणीत यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करत होता. एकूणच महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीची धूम पाहायला मिळाली.

'बृहन्महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंड'तर्फे आयोजित स्वागत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे भाषण झाले. राज्यात आपण महा-एनआरआय फोरम तयार केला असून, त्या माध्यमातून स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषेला नव्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न करीत आहोत, असे फडणवीस यांनी सांगितले.





■ नागपूर : *सद्ध्या भारत दौऱ्यावर आलेल्या न्युझिलंडच्या संघासोबत भारताची टी 20 मालिका लवकरच सुरू होत आहे. या मालिकेतील एक सामना नागपुरच्या जामठा मैदानावर होणार असून, भारतीय संघ शनिवारी नागपूर येथे दाखल झाला. आज या संघाने कसून सराव केला.*

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

**महासागर**

प्रिंट | ई-पेपर | डिजिटल | युट्यूब
सर्व काही एका छताखाली

दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन, नागपूर पोस्ट (इंग्रजी) आणि संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म,
महासागर मीडिया ग्रुप आज प्रिंटपासून डिजिटलपर्यंत सर्व माध्यमांत सक्षमपणे कार्यरत आहे.

**दररोज वाचनीय – दै. महासागर**

**दै. महासागर** हे केवळ वृत्तपत्र नाही, तर ज्ञान, संस्कार, विचार आणि संवेदनशीलतेचा ५५ वर्षांचा अखंड प्रवास आहे. दररोज वाचनीय, माहितीने परिपूर्ण आणि सर्व वयोगटांना सामावून घेणाऱ्या नव्या, नव्या पुरवण्यांच्या माध्यमातून एक व्यक्ती नव्हे तर अवघं कुटुंब वाचावं, हाच आमचा प्रामाणिक उद्देश आहे.
**गेल्या ५५ वर्षांपासून सामाजिकतेचा वसा जपणारे दै. महासागर,** समाजप्रबोधन, शिक्षण, संस्कृती, आरोग्य, साहित्य आणि अध्यात्म या सर्वांचा संतुलित संगम साधत आहे. आपणही या वाचनसंस्कृतीचा भाग व्हावा, हीच आमची आपेक्षा.

**दर दिवशी विशेष वाचनीय पुरवणी दै. महासागर सोबत**

**सोमवार – कॅलिडोस्कोप**
विश्वनिर्मितीपासून ते नव्या शोधांपर्यंतचा प्रवास
या सदरातून वाचकांना विज्ञान, अंतराळ, निसर्ग, तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या अद्भुत विश्वात घेऊन जाण्याचा प्रयत्न केला जातो. विश्वाची निर्मिती कशी झाली, पृथ्वीचे रहस्य, आधुनिक विज्ञानातील नवे शोध, AI, अंतराळ मोहिमा, सर्व काही सोप्या, समजेल अशा भाषेत.
• विद्यार्थ्यांपासून जिज्ञासू वाचकांपर्यंत सर्वांसाठी बौद्धिक मेजवानी.

**मंगळवार – जोश**
तरुणाईसाठी प्रेरणादायी ऊर्जा
फॅशन, फूड, करियर, यशकथा, स्टार्टअप्स, नवे ट्रेंड्स, आजच्या नव्या दमाच्या तरुणाईला जगण्यासाठी बळ देणारे सदर म्हणजे 'जोश'.
• अपयशातून उभे राहण्याच्या कथा, करियर मार्गदर्शन, आत्मविश्वास वाढवणारे लेख
• जीवनात "मीही करू शकतो" हा विश्वास निर्माण करणारे विचार

**बुधवार – निरामय**
चांगल्या आरोग्यासाठी खास मार्गदर्शन
आरोग्य ही खरी संपत्ती आहे, हेच या सदराचे सूत्र. दैनंदिन आरोग्य टिप्स, आहार, व्यायाम, मानसिक आरोग्य, तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन, सर्वसामान्यांना उपयोगी पडेल असे व्यवहार्य आरोग्यज्ञान येथे मांडले जाते.
• आजारांपेक्षा आरोग्य जपण्यावर भर.

**गुरुवार – अस्मिता**
छंद, कौशल्य आणि नव्या निर्मितीचा शोध
माणूस केवळ नोकरीने नाही, तर त्याच्या छंदानेही जगतो.
लेखन, चित्रकला, संगीत, हस्तकला, फोटोग्राफी, उद्योजकता,
स्वतःमधील सुप्त कला ओळखण्यास मदत करणारे सदर.
• व्यक्तिमत्त्व विकास आणि आत्मसन्मान वाढवणारे लेखन.

**शुक्रवार – भक्ती मार्ग**
भक्ती, श्रद्धा आणि जीवनमूल्यांचा मार्ग
भक्तीचा मार्ग शेवटी सुखाकडे नेतो,
काय चांगले, काय वाईट, कर्म,कर्तव्य, देवाचा महिमा आणि माणूस म्हणून आपली जबाबदारी
या साऱ्यांवर चिंतन करणारे आध्यात्मिक सदर.
• मनाला शांतता, जीवनाला दिशा देणारे विचार.

**शनिवार – बालांगण**
लहानग्यांचे निरागस विश्व
मुलांना काय हवे आहे, काय नको
त्यांचे भावविश्व, शिक्षण, खेळ, संस्कार, पालकांसाठी मार्गदर्शन
या सर्वांचा समतोल साधणारे सदर.
• उद्याच्या पिढीचा विचार आजच.

**रविवार – साहित्य मैफिल**
शब्दांची, विचारांची आणि भावनांची मेजवानी
कविता, कथा, लेख, समीक्षा,भ्रमंती लाईव्ह स्टोरी सदर
नवोदित व प्रस्थापित लेखकांचे दर्जेदार साहित्य
दै. महासागरची साहित्यिक परंपरा जपणारे हे सदर.
• साहित्यप्रेमींना विचारांची समृद्धी देणारे व्यासपीठ.

**'खरीखरी' हा विशेष अग्राग्रलेख**
दररोज ज्येष्ठ संपादक व विचारवंत **श्रीकृष्ण चांडक** यांचा **'खरीखरी'** हा विशेष अग्राग्रलेख दै. महासागरमध्ये नियमितपणे प्रसिद्ध होतो.दररोज स्वतःच्या नावाने अग्रलेख लिहिणारे ते राज्यातील पहिले वृत्तपत्र मालक, संचालक संपादक ठरले आहेत.'खरीखरी' या सदरातून ते कोणताही आडपडदा न ठेवता समाज, राजकारण, प्रशासन आणि लोकजीवनातील वास्तव मांडतात.सत्तेच्या विरोधात उभे राहण्याचे धाडस, अन्यायाविरुद्ध स्पष्ट भूमिका आणि सामान्य माणसाच्या बाजूने ठामपणे बोलण्याची ताकद, हेच या अग्राग्रलेखाचे वैशिष्ट्य आहे.

**दै. महासागर म्हणजे बातम्यांसोबत विचार, वाचनासोबत संस्कार आणि समाजासोबत आपुलकी दररोज वाचनीय, दररोज उपयुक्त.**

**ई-पेपर – महासागर मीडिया ग्रुप**
https://epaper.dainikmahasagar.in
दै. महासागर, दै. युवराष्ट्र दर्शन आणि नागपूर पोस्ट (इंग्रजी) हे सर्व वृत्तपत्रे आता जगाच्या कुठल्याही कोपऱ्यातून, कुठेही आणि कधीही सहज वाचता येतात.
• आकर्षक आणि आधुनिक मांडणी
• एका क्लिकवर सर्व पेपर्स उपलब्ध
• मोबाईल, टॅब, लॅपटॉपवर सहज वाचन

**डिजिटल महासागर मीडिया ग्रुप**
https://dainikmahasagar.in
सर्व बातम्या एका ठिकाणी, सर्वांसाठी.
डिजिटल महासागरवर टाकलेली प्रत्येक बातमी लिंकच्या माध्यमातून तातडीने सर्वत्र पोहोचते.
• वेगवान आणि विश्वासार्ह बातम्या
• अपडेट्स रिअल टाइममध्ये
• काळ डिजिटलचा आहे आणि महासागरने त्यानुसार पुढचे पाऊल टाकले आहे.

**महासागर युट्यूब न्यूज चॅनल**
youtube.com / mahasagarnews
अनेक दर्जेदार शो, ग्राउंड रिपोर्टिंग, रोजच्या राजकीय-सामाजिक घडामोडी, महासागर मीडिया ग्रुपच्या सर्व लाईव्ह अपडेट्स आणि सेम टीव्हीच्या धर्तीवर उभे राहत असलेले डिजिटल व्हिडिओ साम्राज्य.
• लाईव्ह रिपोर्टिंग
• ग्राउंड रिॲलिटी
• लोकांच्या प्रश्नांना थेट व्यासपीठ

प्रिंटचा विश्वास, डिजिटलचा वेग आणि समाजासाठी पत्रकारिता. | **महासागर मीडिया ग्रुप** बातमी सर्व सामान्यांच्या मनातली.

# उद्धव ठाकरे डिप्रेशनमध्ये

## नारायण राणेंची खोचक टीका



■ **मुंबई :** महानगर पालिका निवडणुकीच्या निकालानंतर मुंबईच्या महापौरपदावरून रंगलेल्या चर्चेत आता भाजप नेते आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी उडी घेतली आहे. "उद्धव ठाकरे सध्या डिप्रेशनमध्ये गेले असून ते जे बोलतात त्याला वास्तवाचा कोणताही आधार नाही. ज्यांच्याकडे संख्याबळ नाही, त्यांचा महापौर काय आकाशातून पडणार का?" अशा शब्दांत राणेंनी उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल केला.

राणे म्हणाले, उद्धव ठाकरे आता देवावर विसंबून राहत आहेत, पण त्यांनी देवाला आतापर्यंत कधी जोडलेच नाही. भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडे स्पष्ट बहुमत आहे. मग तुमचा महापौर कसा होणार? एकदा संख्याबळ तपासून बघा. एवढा मोठा फरक तुम्ही कसा भरून काढणार? त्यांचा महापौर काय आकाशातून पडणार का?

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीवरही नारायण राणेंनी निशाणा साधला. "सुरुवातीला जेव्हा दोन्ही ठाकरे बंधू एकत्र होते, तेव्हा ते काही करू शकले नाहीत. वेगळे झाल्यावरही त्यांना काही करता आले नाही आणि आता पुन्हा एकत्र येऊनही ते काही करू शकले नाहीत. आम्हाला बाहेरचा मार्ग दाखवल्यामुळे आता नफा-तोटा काय असतो, याचा अनुभव उद्धव ठाकरेंना येत आहे. त्यांची शिवसेना आता फक्त नावाला उरली आहे," असे राणे म्हणाले.

# जागतिक कंपन्या इतर राज्यांकडे महाराष्ट्राचे काय?

## रोहित पवारांचा सरकारला टोला



■ **मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत हे आज स्वित्झर्लंडमधील दावोस येथे होणाऱ्या जागतिक आर्थिक परिषदेसाठी रवाना झालेत. पाच दिवसीय दौऱ्यात महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. मात्र, या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावरून सरकारवर टीका करत गुंतवणुकीच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत.

रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये जागतिक कंपन्या महाराष्ट्राऐवजी इतर राज्यांना पसंती देत असल्याची उदाहरणे दिली आहेत. देशाचे आर्थिक इंजिन असलेल्या महाराष्ट्राला जागतिक कंपन्यांची गुंतवणूक का मिळत नाही, असा थेट सवाल करत रोहित पवार यांनी सरकारच्या गुंतवणूक धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दावोस दौऱ्यात मुख्यमंत्री व उद्योगमंत्र्यांनी प्रत्यक्ष गुंतवणूक महाराष्ट्रात आणण्यासाठी ठोस प्रयत्न करावेत आणि राज्यातील बेरोजगार तरुणांना खऱ्या अर्थाने दिलासा द्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. केवळ कागदावरचे सामंजस्य करार न करता प्रत्यक्ष उद्योग उभे राहावेत, असा सूचक टोलाही त्यांनी लगावला.

# मतदानासाठी महिलांना बीडहून पिंपरी-चिंचवडला नेले

■ **मुंबई :** महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील एका महिलेने दावा केला आहे की, तिला महानगरपालिका निवडणुकीत मतदान करण्यासाठी दुसऱ्या जिल्ह्यात नेण्यात आले होते. महिलेनुसार, तिच्यासोबत असे घडलेली ती एकटीच नाही. १५ जानेवारी रोजी निवडणुकीच्या दिवशी बीड जिल्ह्यातून सुमारे ४ बस भरून महिला पिंपरी-चिंचवडमध्ये मतदान करण्यासाठी गेल्या होत्या.

महिलेने सांगितले की, ती बीडच्या गेवराई तालुक्याची रहिवासी आहे. तिला मतदानाची माहिती नव्हती. तिला सांगण्यात आले होते की, पुणे जिल्ह्यातील जेजुरी येथील खंडोबा मंदिरात स्वयं सहायता गटाची (बचत गटाची) बैठक होणार आहे. त्यामुळे महिला बसमध्ये बसून निघून गेल्या.

महिलेने १७ जानेवारी रोजी बीडच्या पोलीस अधीक्षक यांच्याकडे या प्रकरणाची तक्रार केली आणि सांगितले की, या सगळ्यामागे एक दुसरी महिला होती. तिने आरोपी महिलेविरुद्ध फसवणुकीचा एफआयआर दाखल करण्याची मागणी केली आहे.

तक्रारदार महिलेनुसार, आरोपी महिलेने तिला एका विशिष्ट पक्षाला मतदान करण्यास सांगितले होते. तिने पिंपरी-चिंचवडमध्ये मतदानही केले, परंतु पोलिसांनी तिला पकडले होते आणि संध्याकाळी ६ वाजल्यानंतर सोडले. नंतर तिला कोणतेही पैसे मिळाले नाहीत. या प्रकरणी चौकशी सुरू झाली आहे.

# मुंबई धावली



**मुंबई, दि. १८ प्रतिनिधी**

आज मुंबई मॅरेथॉनमध्ये ६५ हजारांहून अधिक धावपटूंनी सहभाग घेतला. या गोल्ड लेबल इंटरनॅशनल शर्यतीची एकूण बक्षीस रक्कम जवळपास ३.५४ कोटी रुपये आहे. ४२ आणि २१ किलोमीटरच्या या शर्यतीत सहभागी होणाऱ्या धावपटूंना कोस्टल रोडवर धावण्याची संधी मिळाली. मुंबई मॅरेथॉनच्या मार्गात पहिल्यांदाच कोस्टल रोडचा समावेश करण्यात आला. सर्वसामान्यांसह या मॅरेथॉनमध्ये काही सेलिब्रिटींनीही भाग घेतला. सकाळी ५ वाजता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या उपस्थितीत या मॅरेथॉनला सुरुवात झाली. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याकडून या ड्रीम रनला फ्लॅग दाखवण्यात आला. मुंबई मॅरेथॉनच्या ड्रीम रनमध्ये अभिनेता आमिर खान त्याच्या संपूर्ण कुटुंबासह सहभागी झाला.

जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनीसुद्धा या मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला आहे. ओमर अब्दुला यांनी माहीम इथून यात सहभाग घेतला. याविषयी प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, "मी बऱ्याच काळापासून मुंबई मॅरेथॉनबद्दल ऐकत आहे. मी मुंबई हाफ मॅरेथॉनमध्ये भाग घेत आहे. तरुणांनी आरोग्याला प्राधान्य द्यावं आणि स्मार्टफोनवर जास्त वेळ घालवणं टाळावं. आपण दररोज खेळ आणि व्यायामात भाग घेतला पाहिजे. आमच्यासारखे लोक मुंबईत येतात तेव्हा इथे आधीपेक्षा खूप फरक पाहतात. मी मुंबईत होतो. मी इथे तीन वर्षे राहिलो. त्यावेळी कोस्टल रोडसारखी पायाभूत सुविधा बांधली जाईल अशी आम्हाला कल्पनाही नव्हती. पण ती बांधली गेली आणि जर मुंबईसाठी अशा आणखी गोष्टी बांधल्या गेल्या तर त्याचा फायदा रहिवाशांना होईल."

## इथियोपियाच्या टाडू अबाटे डेमे पहिला

स्वप्नांच्या नगरी मुंबईच्या रस्त्यांवर आज वेग आणि जिद्दीचा अनोखा संगम पाहायला मिळाला. देश-विदेशातून आलेल्या हजारो धावकांनी टाटा मुंबई मॅराथन २०२६ मध्ये उत्साहात सहभाग घेतला. दमट हवामान आणि तीव्र स्पर्धेचा सामना करत इथियोपियाच्या दिग्गज धावपटू टाडू अबाटे डेमे यांनी शानदार कामगिरी करत आंतरराष्ट्रीय एलीट पुरुष गटाचे विजेतेपद पटकावले.

स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच डेमे यांनी वेग कायम राखत २ तास ९ मिनिटे ५५ सेकंदात फिनिश लाईन पार केली आणि ऐतिहासिक विजय नोंदवला. या विजयाबद्दल त्यांना ४५ लाख रुपयांची रोख बक्षीस देण्यात आली. केनियाचे लियोनार्ड लांगट दुसऱ्या क्रमांकावर राहिले, तर इथियोपियाच्या मेरहवी वेल्डमरयम यांनी तिसरा क्रमांक पटकावला.

महिला गटातही इथियोपियाचे वर्चस्व कायम राहिले. येशी कालायु चेकोले यांनी २ तास २५ मिनिटे १३ सेकंदांची वेळ नोंदवत आंतरराष्ट्रीय एलीट महिला गटात सुवर्णपदक पटकावले. विशेष बाब म्हणजे महिला गटाच्या तिन्ही पदकांवर इथियोपियाच्या धावपटूंनी वर्चस्व मिळवले.

यंदाच्या मॅराथनमध्ये देशातील एकूण ३६ आघाडीच्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये २३ पुरुष आणि १३ महिला धावपटूंचा समावेश होता.

**इंडियन एलीट गटात कार्तिक कारकेरा अव्वल**

भारतीय धावपटूंनीही या स्पर्धेत दमदार कामगिरी केली. इंडियन एलीट पुरुष गटात कार्तिक कारकेरा सर्वात वेगवान ठरले. त्यांनी २ तास १९ मिनिटे ५५ सेकंदांची वेळ नोंदवत पहिला क्रमांक मिळवला आणि नवा विक्रम प्रस्थापित केला. अनीश मगर यांनी २ तास २० मिनिटे ८ सेकंदांची वेळ नोंदवत दुसरा क्रमांक मिळवला.

टाटा मुंबई मॅराथन २०२६ ने पुन्हा एकदा सिद्ध केले की ही केवळ धावण्याची स्पर्धा नसून जिद्द, समर्पण आणि जागतिक क्रीडा भावनेचा उत्सव आहे.

भारतीय एलीट महिला वर्गात भारताच्या धावपटू संजीवनी जाधव यांनी आपल्या अनुभवाचे दर्शन घडवत २ तास ४९ मिनिटे २ सेकंदांची वेळ नोंदवून सुवर्णपदक पटकावले.

# देशभरात गेल्या वर्षी ३७ चित्रपटांनी ओलांडला १०० कोटींचा टप्पा



**अशी वाढली कमाई**

| | |
|---|---|
| 2022 | ₹ 10,637 |
| 2023 | ₹ 12,226 |
| 2024 | ₹ 11,833 |
| 2025 | ₹ 13,397 |

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :** २०२५ हे वर्ष भारतीय चित्रपटसृष्टीसाठी कोविडनंतरचे सर्वात यशस्वी वर्ष ठरले आहे. तिकीट खिडकीवरील कमाईत वार्षिक आधारावर १३ टक्क्यांनी वाढ झाली. या वाढीमध्ये तिकीट दरातील २० टक्के वाढीचाही मोठा वाटा आहे.

हिंदीत या वर्षी कमी चित्रपट आले असले तरी 'धुरंधर 'सारख्या चित्रपटामुळे हिंदी सिनेमाने पॅन इंडिया स्तरावर मोठी झेप घेतली. आदित्य धर दिग्दर्शित या चित्रपटाने देशात ९५० कोटी आणि जगभरात १३०० कोटींहून अधिक व्यवसाय केला.

यामुळे हा हिंदी चित्रपट इतिहासातील (या संदर्भात) सर्वात यशस्वी चित्रपट मानला जात आहे. याव्यतिरिक्त 'छावा', 'सैयारा' आणि 'वॉर-२' सारख्या हिंदी चित्रपटांनीही टॉप-१० मध्ये स्थान मिळवले.

देशभरात ३७ चित्रपटांनी १०० कोटींहून अधिक कमाई केली. २०२४ मध्ये ही संख्या केवळ २२ होती. मल्याळम चित्रपटांचा व्यवसाय २०२४ मधील ५७२ कोटींवरून वाढून १,१६५ कोटींवर पोहोचला. तमिळ सिनेमाच्या तिकीट विक्रीत १७ टक्के, तर तेलुगू सिनेमात १५ टक्क्यांनी घट झाली.

बाहुबली सिरीजच्या यशानंतर ९ वर्षांत ही केवळ चौथी वेळ आहे, जेव्हा कमाईच्या बाबतीत एखादा हिंदी चित्रपट देशात पहिल्या क्रमांकावर राहिला आहे. या वर्षी आदित्य धर यांच्या 'धुरंधर' ने देशात ९५० कोटी आणि जगभरात एकूण १३०० कोटींची कमाई केली आहे.

२०२३ मध्ये जवान (११५० कोटी), २०२० मध्ये तान्हाजी (३६८ कोटी) आणि २०१९ मध्ये वॉर (४७५.५ कोटी) हे त्या-त्या वर्षातील नंबर वन चित्रपट होते. दरम्यानच्या काळात २०१७ मध्ये बाहुबली (१८०० कोटी), २०२१ मध्ये पुष्पा द राइज (३७८ कोटी), २०२२ मध्ये आरआरआर (१२५३ कोटी) यांसारख्या तेलुगू चित्रपटांनी कमाईत देशात पहिला क्रमांक पटकावला होता. आता हिंदी चित्रपटही आघाडीवर आहेत.

# शिंदेंच्या होम ग्राउंडवर भाजपची खेळी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**

ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ७५ जागा जिंकून एकतर्फी वर्चस्व गाजवले असले तरी युतीचा मित्रपक्ष असलेल्या भाजपने आता थेट विरोधात बसण्याची तयारी दर्शवून सर्वांनाच धक्का दिला आहे. सत्ता अमर्याद नसावी, त्यावर अंकुश हवा, अशी भूमिका घेत भाजप नेत्यांनी थेट संघर्षाचे संकेत दिले आहेत.

ठाण्यातील १३१ जागांपैकी महायुतीने १०३ जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे. यामध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ७५ जागा जिंकल्या आहेत. भाजपला २८ जागांवर यश मिळाले असून शरद पवार गटाने १२, अजित पवार गटाने ९ आणि उद्धव ठाकरे गटाला केवळ एका जागेवर समाधान मानावे लागले.

ठाण्यात उद्धव ठाकरेंचे निष्ठावंत माजी खासदार राजन विचारे यांच्या पत्नीचाही पराभव झाला. त्यामुळे ठाण्यात ठाकरेंना मोठा धक्का बसला आहे.

## विरोधात बसण्याची तयारी

शिवसेना फुटीचा फायदा थेट भाजपला होईल असे म्हटले जात होते. पण त्याचा काहीच फरक पडलेला दिसत नाही. त्यामुळे भाजपमध्ये नाराजीचा सूर आहे. शिंदेंचे एकतर्फी वर्चस्व असले तरी सत्ता अमर्याद नसावी म्हणत भाजप शिंदेंच्या प्रभावावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न करत आहे.

महापौरपदासाठी स्वतःहून न जाण्याचा पवित्रा घेऊन भाजपने सत्तेत सन्मानजनक वाट्यासाठी दबावतंत्राची खेळी खेळली आहे. राज्यात युती असली तरी स्थानिक पातळीवर ह्लशरणह्न न जाता आक्रमक विरोधकाची भूमिका घेत भाजपने आपली भविष्यातील विस्ताराची रणनीती स्पष्ट केली आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे भाजपने स्पष्ट केले आहे की ते महापौरपदाच्या चर्चेसाठी स्वतःहून पुढाकार घेणार नाहीत. ह्लत्यांना (शिवसेनेला) चर्चा करायची असेल तर ते येतील, आम्ही जाणार नाही, असे म्हणत भाजपने आपला कडक पवित्रा जाहीर केला आहे. एकूणच एकनाथ शिंदेंच्या बालेकिल्ल्यात शिवसेना-भाजपमध्ये सर्व काही आलबेल नसल्याचेच यावरून स्पष्ट होत आहे. मात्र भाजपच्या या भूमिकेवर शिंदे गटाकडून अजून कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आलेली नाही.

**सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवू**

भाजपचे आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका स्पष्ट केली. केळकर म्हणाले की, आम्ही ४० जागा लढवल्या आणि २८ जागांवर यश मिळवले. आम्ही सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम करू. वेळ पडली तर विरोधात बसायलाही आम्ही तयार आहोत, असेही त्यांनी या वेळी बोलताना सांगितले आहे. भाजपच्या या भूमिकेवर आता ठाण्यातील शिंदेसेनेच्या निर्णयाकडे लक्ष लागले आहे.

# शिंदे गटाकडून अडीच वर्षासाठी महापौर पदाची मागणी?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १८ :**

बीएमसी निवडणुकीच्या निकालांनी महाराष्ट्राच्या राजकारणात एक नवीन वळण घेतले आहे. भाजप मुंबईतील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे. भाजप पहिल्यांदाच महापौर होणार असल्याचे स्पष्ट संकेत आहेत. तथापि, एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या २९ नवीन नगरसेवकांना हॉटेल ताज लँड्स एंड येथे हलवले आहे, बाहेर कडक सुरक्षा व्यवस्था आहे.

माहितीनुसार, शिंदे गटाचे म्हणणे आहे की २०२६ हे शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांची जन्मशताब्दी आहे. त्यामुळे किमान अडीच वर्षांसाठी शिवसेनेचा महापौर निवडला पाहिजे. यामुळे भाजप आणि शिंदे गटांमध्ये वाद निर्माण झाला आहे.

रविवारी, उद्धव ठाकरे गटाचे संजय राऊत यांनी दावा केला की एकनाथ शिंदे स्वतः भाजपला बीएमसीचा महापौर बनवू इच्छित नाहीत आणि म्हणूनच ते नगरसेवकांना हॉटेलमध्ये ठेवत आहेत. शिंदेसेना- भाजपामधील कलह आता वाढताना दिसत आहे.

# महाराष्ट्राने पतंग मनावर घेतला



■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ :**

छत्रपती संभाजीनगर मनपा निवडणुकीत एमआयएमने मिळवलेल्या घवघवीत यशानंतर पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील कमालीचे उत्साहात आहेत. मुंबईत मनसे आणि राष्ट्रवादीपेक्षा जास्त जागा जिंकणे असो वा संभाजीनगरमध्ये 33 जागांचा टप्पा गाठणे, इम्तियाज यांनी या यशाचे विश्लेषण करताना महाराष्ट्रालापतंग भावली, असे उत्तर दिले.

इम्तियाज जलील म्हणाले, आम्ही एक मोठी शक्ती म्हणून उदयास आलो आहोत. सोलापूर, मुंब्रा, अमरावती अशा सर्वच ठिकाणी आमचे प्रतिनिधित्व वाढले आहे.?आम्ही केवळ 7-8 जागा अतिशय कमी? फरकाने हरलो, नाही तर हा आकडा आणखी मोठा असता. एमआयएम हा? आता केवळ एक पक्ष नसून महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्त्वाचा "किरदार" बनला आहे.

मुंबई महापालिकेत एमआयएमच्या भूमिकेविषयी ते म्हणाले, आमची भूमिका स्पष्ट आहे. शहराच्या विकासासाठी चांगले निर्णय असतील, तर आम्ही भाजपला नक्कीच साथ देऊ. पण, जर कुणी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी हिडन अजेंडा घेऊन येत असेल, तर आम्ही खंबीर विरोध करू. जसा आम्ही समांतर पाणी योजनेला केला होता. मी सर्वपक्षीय नेत्यांना आवाहन करतो की, आता निवडणुका संपल्या आहेत, एकमेकांवरची चिखलफेक थांबवून शहराच्या प्रगतीसाठी एका प्लॅटफॉर्मवर या.

महाराष्ट्रात एमआयएमने मोठी मुसंडी मारली आहे, या निकालाकडे पाहताना प्रदेशाध्यक्ष म्हणून हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. "बेटर लेट दॅन नेव्हर" महाराष्ट्राच्या जनतेने आता एमआयएमला मनापासून स्वीकारले आहे. लोकांना जाणीव झाली आहे की केवळ एमआयएमच त्यांच्यासाठी लढू शकते.

आज संपूर्ण महाराष्ट्रात आमचे 125 नगरसेवक निवडून आले आहेत. मुंबईत आमचे 8 नगरसेवक आहेत, ही संख्या राज ठाकरेंची मनसे आणि दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पेक्षाही जास्त आहे.

एमआयएमवर जातीयवादी असल्याचा शिक्का मारला जाण्यावर ते म्हणाले. गेल्या 70 वर्षांपासून हेच आरोप ऐकतोय. हे आरोप करणारे तेच लोक जे मुस्लिम समाजाला आपली जहागीर समजायचे, असा टोला त्यांनी हाणला.

# स्मार्ट सिटी झाली, पण संस्थांकडे देखभालीसाठी निधीची चणचण

## राज्य वित्त आयोग वेळेवर स्थापन नाही

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ :**

बहुतेक हिंदी भाषिक राज्यांमध्ये, स्वच्छता, ड्रेनेज, पिण्याचे पाणीपुरवठा आणि रस्ते बांधकाम यासारख्या शहरी आणि ग्रामीण कामांवर परिणाम होत आहे. याचे कारण म्हणजे राज्य वित्त आयोग (एसएफसी) वेळेवर स्थापन केला जात नाही.

जरी तो स्थापन केला गेला तरी त्याच्या शिफारशींचे पालन केले जात नाही. जरी शिफारसी स्वीकारल्या गेल्या तरी, अंमलबजावणी अहवाल जारी केला जात नाही. शहरी संस्थांच्या आर्थिक व्यवस्थापनावर काम करणाऱ्या जनआग्रह या स्वयंसेवी संस्थेने प्रसिद्ध केलेल्या वार्षिक अहवालात हे उघड झाले आहे.

अहवालानुसार, राज्य वित्त आयोगांच्या स्थापनेसाठी घटनात्मक तरतुदींनंतर १७ राज्यांमध्ये फक्त २५ राज्य वित्त



आयोग स्थापन करण्यात आले. तथापि, यापैकी १४ राज्यांनी आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीचे अहवाल सादर करण्यासाठी एक वर्षापेक्षा जास्त वेळ घेतला. उर्वरित राज्यांनी कोणताही अहवाल सादर केला नाही.

जनआग्रहने ९ राज्यांच्या वित्त आयोगांच्या १,१३८ शिफारशींचा अभ्यास केला. त्यापैकी फक्त ६८% स्वीकारण्यात आल्या. उर्वरित शिफारशी विनाकारण नाकारण्यात आल्या.

एकंदरीत, राजस्थान, हरियाणा, तामिळनाडू, बिहार, केरळ, आसाम आणि हिमाचल प्रदेश या सात राज्यांमध्ये सर्व सात वित्त आयोग वेळेवर स्थापन करण्यात आले. तथापि, तामिळनाडू आणि केरळ वगळता, इतर पाच राज्यांमध्ये राज्य वित्त आयोगांच्या शिफारशी पूर्णपणे अंमलात आणल्या गेल्या नाहीत.

# राष्ट्रवादीची ४० स्टार प्रचारकांची यादी जाहीर

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ :**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा धुरळा खाली बसत नाही, तोच आता जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी कंबर कसली असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने ४० स्टार प्रचारकांची जंगी यादी जाहीर केली आहे.

या यादीत उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. विशेष म्हणजे, अलीकडेच चर्चेत असलेले नवाब मलिक आणि झिशान सिद्दीकी यांनाही स्टार प्रचारक म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.

# विनयभंग प्रकरणी आरोपीस १ वर्ष कारावासाची शिक्षा व २००० रु दंड

**अकोला :** प्रथम वर्ग न्यायदडाधिकरी यांनी पोलिस स्टेशन पातुर हददीतील ग्राम माझोड येथे दिनांक २९/०७ / २०१६ रोजी फिर्यादी पिडीता यांनी घडलेल्या घटनेची तक्रार दिली कि घटनेतील आरोपी शंकरराव विश्वासराव टाले रा. माझोड ता. पातुर जि. अकोला याने पिडीता हि शौच्छास जात असतांना आरोपिने पिडीताचा पाठलाग करून तिचा हात धरून, तु मला आवडतेस असे म्हणुन विनयभंग केला वरून आरोपी विरुद्ध पोलिस स्टेशन पातुर येथे अप क १४७/२०१६ कलम ३५४. अ (१) ३५४ ड, भादविच्या प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता गुन्हयाचा तपास पो. हवा. संजय चव्हाण बं.नं. १६८१ यांनी करून दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले होते.सदर प्रकरणी साक्ष पुराव्यावरून मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पातुर, जि. अकोला यांनी गुन्हयातील आरोपी शंकरराव विश्वासराव टाले रा. माझोड ता. पातुर जि. अकोला यास कलम ३५४. भादविच्या कलमान्वये दोषी ठरवुन ०१ वर्ष कारावास व २००० रु दंडाची शिक्षा सुनावली आहे. . दंड न भरल्यास ०१ महीना साधी कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सदर गुन्हयात सरकारी पक्षाची बाजु . पी. एस ठाकरे सरकारी अभियोक्ता यांनी मांडली असुन पातुर येथील पैरवी अंमलदार पो.हवा मो. नियाज खान यांनी कोर्ट पैरवी म्हणुन कामकाज पाहिले आहे. सदर प्रकरणी पोलिस अधिक्षक, अकोला, अपर पोलिस अधिक्षक, अकोला, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री पडघान व ठाणेप्रभारी श्री डोपेवाड यांनी केले.

# वर्तमान काळात पर्यावरण रक्षणाची अधिक गरज : प्रा.डॉ. प्रतिमा इंगोले





■अकोला,दि.१८ (प्रतिनिधी)■
आजच्या धकाधकीच्या धावपळीच्या युगात कोणालाच वेळ नाही. माणसांची यंत्र झाली आहेत जागतिकरण काळाच्या बोकांडी बसली आहे. पैशाला महत्व प्राप्त झाले आहे पण वर्तमान युगात पर्यावरण रक्षणाची अधिक गरज असल्याचे प्रतिपादन दुसऱ्या राज्यस्तरीय वनराई बालकुमार साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष प्रा. डॉ. प्रतिमा इंगोले यांनी केले.

पद्मविभूषण डॉक्टर मोहन धारिया जन्मशताब्दी निमित्त श्री शिवाजी महाविद्यालयात आयोजित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषण प्रसंगी बोलत होत्या. संमेलनाची उद्धाटक शेतकरी नेते प्रकाश पोहरे, स्वागतध्यक्ष प्रा. माया डिवरे ,वनराईचे सचिव अमित वाडेकर, पूणे, ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. अजित वर्तक ,अमरावती वनराईचे मधु भाऊ घारड, डॉक्टर विजय निलावार हिंगोली ,विलास देशपांडे परभणी ,ज्येष्ठ उद्योजक प्रशांत देशमुख, विजय कौसल, प्रशांत गावंडे ,विजय ठोकळ ,प्रा. प्रवीण ढोणे, श्रीकृष्ण विखे पाटील, डॉ. विवेक हिवरे , संमेलन संयोजक बबनराव कानकिरड यांची याप्रसंगी विचारपिठावर प्रमुख उपस्थिती होती.पी एम श्री जिल्हा परिषद विद्यालय कामरगाव, गुरुकुंज कॉन्व्हेंट बोथाकाजी,श्री गुरुदेव किर्तन विद्यालय मलकापूर, महात्मा गांधी विद्यालय गांधीग्राम व महात्मा फुले विद्यालय आगर च्या विद्यार्थ्यांनी काढलेल्या ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात झाली. वनराईचे संस्थापक मोहन धारिया व पर्यावरण शास्त्रज्ञ माधव गाडगीळ यांच्या फोटोचे पूजन करण्यात आले. कवी राम राव पाटेखेडे यांनी संमेलन गीत व वनराई गीत सादर केले.

संमेलनाचे संयोजक बबनराव यांनी प्रास्ताविक केले. स्वागताध्यक्ष प्राध्यापक माय डिवरे यांनी सर्वांचे स्वागत केले. संमेलनाचे उद्धाटक प्रकाश पोहरे यांनी आपल्या भाषणातून मोहन धारिया यांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा दिला आणि धारेजींच्य विचारांचा वारसा जोपासण्यासाठी असे संमेलन होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले .त्याचबरोबर सध्या वेगवेगळ्या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत आहे .

एका झाडाच्या बदल्यात दहा झाडे लावण्याचे आश्वासन दिले जाते परंतु प्रत्यक्षात तसे होत नाही .त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वनाचे अच्छादन कमी होत आहे ही चिंतेची बाब आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक केवळ दिल्लीचा नाही तर हवा प्रदूषणाची समस्या देश पातळीवर निर्माण झाली आहे .शुद्ध हवा, शुद्ध पाणी उपलब्ध होत नाही ,शेतकऱ्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही या आमच्या देशातील गंभीर समस्या आहेत त्यावर चिंतन होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन किसान बी ग्रेडचे अध्यक्ष प्रकाश पोहरे यांनी केले .वनराई बालकुमार साहित्य संमेलनामुळे वनराईचे संस्थापक मोहन धारिया व पर्यावरण शास्त्रज्ञ माधव गाडगीळ यांच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे . डॉक्टर मोहन धारिया यांनी राजकारणापेक्षा सामान्य जनतेच्या प्रश्नांना व देशासमोरील पर्यावरण समस्या सोडवण्याला अग्रक्रम दिला.

त्यांचे कार्य पुढील पिढीला, कार्यकर्त्यांना सतत प्रेरणा देत राहील. विशेषता बालकुमारांना पर्यावरण जाणीव जागृतीसाठी वैज्ञानिक दृष्टिकोन वृद्धिगत करण्यासाठी हे संमेलन यशस्वी ठरले असे प्रतिपादन वनराईचे सचिव अमित वाडेकर यांनी केले. अकोल्याची लेक व सुप्रसिद्ध लेखिका प्राध्यापक प्रतिमा इंगोले यांच्या कवितांनी रसिकांची मने जिंकली .

## अकोल्यात ‘ऑपरेशन प्रहार‘ अंतर्गत मोठी कारवाई

# गोवंश तस्करी उधळली : ९ गोवंशांना जीवनदान, ७.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त



■अकोला,दि.१८ (प्रतिनिधी)■
अकोला पोलीस दलाने गोवंश तस्करीविरोधात धडक कारवाई करत ‘ऑपरेशन प्रहार‘ अंतर्गत मोठे यश मिळवले आहे. मा. पोलीस अधीक्षक अकोला श्री. अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी पोलीस स्टेशन माना व रामदास पेठ हद्दीत स्वतंत्र कारवाया करण्यात येऊन ०९ गोवंशांना जीवनदान देण्यात आले असून ७.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

माना पोलीस ठाणे हद्दीत कारवाई मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे माना पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकला असता, एक अनोळखी इसम त्याच्या ताब्यातील गोवंशीय बैलांना आखूड दोराने बांधून, अत्यंत अमानुष व निर्दय पद्धतीने कत्तलीच्या उद्देशाने ठेवलेले आढळून आले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत ०५ गोवंशीय बैल ताब्यात घेतले. जप्त गोवंशांची अंदाजे किंमत १.१६ लाख इतकी आहे. रामदास पेठ पोलिसांची कारवाई रामदास पेठ पोलीस स्टेशन हद्दीत अवैधरित्या कत्तलीसाठी गोवंश वाहतूक होत असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ०४ गोवंश व ०१ पिकअप वाहन असा एकूण ६.५० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५, ९, ११ तसेच प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यास प्रतिबंध करणारा अधिनियम १९६० चे कलम ११(१)(ए), (एफ), (एच), (आय) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गोवंश तस्करीविरोधात पोलिसांनि कडक पवित्रा घेतला असून दोन्ही कारवायांमुळे गोवंश तस्करी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. अकोला पोलीस दल गोवंश तस्करी व प्राण्यांवरील क्रूरतेविरोधात कठोर भूमिका घेत असून, ऑपरेशन प्रहार अंतर्गत अशा कारवाया पुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले

## थोडक्यात

### हाता गावात चोरट्यांनी किमती ऐवज लंपास केला



**अकोला:** बाळापूर तालुक्यातील हाता गावात अनंत कुचके यांच्या निवासस्थानी चोरी झाली. त्यांच्या घरातील तिजोरी फोडून चांदीचे शिक्के, ४० हजार रुपये, १० ग्रॅम सोन्याची अंगठी, ५ ग्रॅमची सोन्याची नथ चोरून नेल्याची माहिती अनंता कूचके यांनी दिली. इतकेच नाही तर एका देवस्थानात देखील चोरीचा अयशस्वी प्रयत्न झाल्याची माहिती आहे. याबाबत तक्रार करण्यात आली आहे. पोलिसांनी गावात येऊन पाहणी केली. चोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे.

### काँग्रेस नेते हिदायत पटेल यांना सर्वपक्षीय श्रध्दांजली

**अडगांव बु. :** काँग्रेससचे जेष्ठ नेते हिदायत पटेल यांना सर्व पक्षाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. मिरसाहेब हॉल मधे श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी सभेच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ काँग्रेस नेते मनोहरलाल फाफट होते. शेतकरी संघटनेचे नेते लक्ष्मीकांत कौठकार, नंदकिशोर अढाऊ, गोपाल कोल्हे, संजय राजनकार, डाँ गुलाम नबी, गजानन आप्पा मुंगसे, माणिकराव घाटे, अ. फरीद गु. आरीफ, असलम उल्ला, नाना बहाकर, नरेंद्र मानकर , अभिजीत ढगे, अशोक घाटे, राजीक कुरेशी, शे. जमीर, नारायण पत्की, अजगर अली मिरसाहेब, डॉ. पंजाबराव धामोडे, राजु रोहणकार, दिपक रेळे, अफरोज खाँ, आदी गावातील शेकडो नागरीक विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी पत्रकार उपस्थित होते. यावेळी उपस्थितीतांनी दोन मीनीट मौन पाळुन सामुहीक श्रध्दांजली वाहीली तर मनोहरलाल फाफट यांच्या सह गोपाल कोल्हे, राजीक कुरेशी, डाँ. गुलाम नबी, नरेंद्र मानकर आदीनी पटेल यांच्या सोबतच्या आठवणीना उजाळा दिला. कार्यक्रमाचे संचालन अशोक घाटे यांनी केले.

# अकोला–वाशिम रेल्वे मार्गावर दोन प्रवाशांना लुटले

■अकोला,दि.१८ (प्रतिनिधी)■
अकोल्यातून तसेच अकोलावाशिम मार्गावरून धावणाऱ्या प्रवासी गाड्यांमधील प्रवासी चोरांसाठी जणू सोपे लक्ष्य ठरत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून रेल्वे प्रवासादरम्यान चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असून, ताज्या दोन स्वतंत्र घटनांमुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पहिली घटना अकोला रेल्वे स्थानकावर घडली. हिंगोली येथील रहिवासी रोहित श्याम सिंग ठाकूर हे पुण्याला जाण्यासाठी अकोला स्थानकावर आले होते. यावेळी अज्ञात चोरट्यांनी त्यांना बोलण्यात गुंतवून त्यांचे लक्ष विचलित केले. संधी साधत चोरट्यांनी त्यांचा अंदाजे २९ हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन लंपास केला. चोरीची बाब लक्षात येताच प्रवाशाने तात्काळ लोहमार्ग पोलिसात तक्रार दाखल केली. दुसरी घटना वाशिम रेल्वे स्थानकावर घडली. हैदराबाद येथील रहिवासी गुरुचरण सिंग छाब्रा हे १७६०६ भगत की कोठी एक्सप्रेसने प्रवास करत असताना, वाशिम स्थानकावर अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या आईची पर्स पळवली. या पर्समध्ये १० हजार रुपये रोख, १५ हजार रुपयांचा मोबाईल आणि अंदाजे २५ हजार रुपयांच्या इतर मौल्यवान वस्तू होत्या. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

## प्राणघातक हल्ला प्रकरणात आरोपीला

# १० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

■अकोट,दि.१८ (प्रतिनिधी)■
प्राणघातक हल्ला प्रकरणात आरोपी संजय भटकर याला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी दहा वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. १७ जानेवारी रोजी हा निकाल दिला.

दहीहांडा पोलिस स्टेशन अंतर्गत एका घटनेतील वाद बु. येथील आरोपी संजय भटकर याने लोखंडी फावडयाच्या दांडयाने फिर्यादी विशाल गोटुकडे व त्याचा मित्र विनोद कळसकर यांच्यावर इतर ६ आरोपींच्या मदतीने प्राणघातक हल्ला करुन जीवाने मारण्याचा प्रयत्न केला होता.

या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख न्यायालयात युक्तीवाद केला की १४.०६.१४ च्या रात्री ११ वाजताच्या सुमारास वडद बु. गावजवळील पुर्णा नदीच्या पात्रातून एक ट्रॅक्टर फिर्यादी विशाल व त्याचा मित्र विनोद यांना दिसला ते पाहण्याकरीता नदीकडून येणा–या रस्त्यावर दोघेही थांबले असता निळ्या रंगाचा सोनाली कंपनीचा टॅक्टर आरोपी

संजय भटकर हा स्वतः चालवित होता. गावातील नदीच्या घाटावरुन टॅक्टरद्वारे रेती नेत होता तेव्हा फिर्यादी विशाल व त्याचा मित्र विनोद याने आरोपी संजय भटकर यास म्हटले की आमच्या गावातील नदी खराब का करतोस त्यावर आरोपीने तुझ्या बापाचे काय जाते तुम्हला बघुन घेतो असे म्हणून निघुन गेला. व तो राग मनामधे ठेवून आरोपी संजय भटकर याने इतर ६ आरोपींच्या मदतीने दि. १४.०६.२०१४ चे रात्री ११ वाजता फिर्यादी व त्याचा मित्र विनोद याला बघताच ट्रॅक्टर थांबविला व ट्रॉलीत बसलेल्या लोकांना म्हणाला बघता काय धरा साल्यांना असे म्हणून फिर्यादी विशाल व त्याचा मित्र विनोद कळसकर यास सर्वांनी लाथाबुक्क्यांनी व फावडयांनी मारण्यास सुरवात केली. विशाल गोटुकडे याच्या डोक्यावर मारले व त्याला खाली पाडले, तसेच विनोद कळकसकर याला सुध्दा मारुन जागेवरच तो बेशुध्द पडला व दोघेही जखमी रक्तबंबाळ झाले होते. विशालने विनोदचे वडील वासुदेवराव यांच्या मदतीने उपचाराकारीता ग्रामीण रुग्णालय दहिहांडा येथे विनोदला नेले. परंतु प्रकरण गंभीर असल्याने डॉक्टरांनी अकोला येथे जाण्यास सांगितले. दहीहांडा पो.स्टे. ला माहिती दिल्यानंतर दहीहांडा पोलीसांनी १५.०६.२०१४ चे रात्री विशाल गोटुकडे याच्या बयाणावरुन सर्व आरोपी विरुध्द गुन्ह्याची नोंद केली. तपास अधिकारी उपनिरीक्षक भास्कर तायडे यांनी आरोपी विरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकारी वकील अजित देशमुख यांनी १५ साक्षीदारांच्या साक्षी न्यायालयात नोंदविल्या.

# शहरातील समस्या सुटणार का बिकट होणार?

**अकोला :** महानगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांची नावे सुद्धा घोषित झाली असून लवकरच नवनियुक्त नगरसेवक आपापल्या प्रभागात कामे प्रारंभ करतील. मात्र प्रभाग पद्धतीमध्ये नगरसेवकांची काम करण्याची पद्धत लक्षात घेता व या पद्धतीचे आतापर्यंतचे अनुभव लक्षात घेता भविष्यात प्रभागातील नागरिकांच्या समस्या सुटतील का बिकट होतील? असा प्रश्न नागरिकांच्या मनात उपस्थित होत आहे. शहरात चार वाडचा एक प्रभाग या पद्धतीने निवडणुका घेण्यात आल्या. यापूर्वीसुद्धा अशाच पद्धतीने निवडणुका झाल्या होत्या. मात्र एकाप्रभागातून चार नगरसेवकांना निवडून दिल्यानंतरही जेव्हा नागरिकांकडून नगरसेवकांना कामे सांगितल्या गेली तेव्हा नगरसेवकांनी तुमचा भाग माझ्याकडे येत नाही, असे सांगून चारही नगरसेवकांनी नागरिकांची कामे एकमेकांकडे टोलवण्याचे प्रयत्न केले होते. विशेष म्हणजे प्रभागात चारही नगरसेवक एकाच पक्षाचे असतांना देखील नागरिकांच्या कामांबाबत अशी टोलवाटोलवी झाली होती.

# एकाच रात्री चार ठिकाणी चोरीचे प्रयत्न, चोरट्यांची धिटाई वाढली

■मुर्तिजापुर,दि.१८ (प्रतिनिधी)■
शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात चोरट्यांनी एकाच रात्री चार ठिकाणी चोरीचे प्रयत्न करून नागरिकांची झोप उडवली आहे. मागील काही दिवसांपासून वाढलेल्या कडाक्याच्या थंडीचा फायदा घेत चोरट्यांनी दिवसा रेकी केली आणि रात्री बारानंतर ते पहाटे अडीचच्या सुमारास बंद घरांना लक्ष्य केले. टेलिफोन कॉलनी, अन्नपूर्णा माता मंदिर परिसर, शांतीनगर व लहरिया प्लॉट भागात ही धाडसी कारवाई करण्यात आली.

तीन ठिकाणी दरवाजांचे कडी–कोंडा तोडून घरात प्रवेश करण्याचा प्रयत्न झाला. यापैकी दोन ठिकाणी चोरट्यांच्या हाती काहीच लागले नाही. मात्र एका घरातून कपाटातील साहित्य, नगदी रक्कम व दागिने चोरीला गेले. चौथ्या ठिकाणी घरात घुसण्याचा प्रयत्न करताच जागरूकतेमुळे चोरट्यांनी पळ काढला. विशेष म्हणजे ही





संपूर्ण हालचाल सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून फुटेजमध्ये चोरट्यांची निर्ढावलेली पावले स्पष्ट दिसत आहेत.

एकाच रात्री चार ठिकाणी चोरीचे प्रयत्न झाल्याने शहरातील कायदा–सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल असून शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार अजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मूर्तिजापूर शहर पोलीस कसून तपास करीत आहेत. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून रात्रीची सुरक्षा वाढवण्याची जोरदार मागणी होत आहे.

# शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून वाहतूक नियमांना फाटा

■अकोला,दि.१८ (प्रतिनिधी)■
सध्या शाळा व महाविद्यालये सुरू झाल्याने शहर व परिसरात तरुणाईची वदर्ळ मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर शहरात 'धुम स्टाईल' दुचाकी व चारचाकी वाहनांची रेलचेल वाढताना दिसून येत आहे. मुख्य रस्ते असोत वा गल्ली–बोळ, अनेक ठिकाणी शाळकरी व कॉलेजमधील मुले वेगात, बेदरकारपणे आणि वेगळी स्टाईल दाखवत वाहन चालवताना आढळत आहेत. या'धुम स्टाईल' वाहनचालकामुळे अपघाताचा धोका वाढला असून, पादचारी, ज्येष्ठ नागरिक व ग लहान मुले यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

# सततची नापिकी व कर्जाला कंटाळून मलकापूर तुळजापूर येथे शेतकरी पुत्राची आत्महत्या

■पातुर,दि.१८ (प्रतिनिधी)■
पातूर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मलकापूर तुळजापूर येथे शेतकरी युवा पुत्राने मागील काही वर्षापासून नापिकी व कर्जाला कंटाळून विषारी औषध प्राशन करून आपली जीवन यात्रा संपवली. त्यामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

ही घटना पातूर पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या मलकापूर तुळजापूर येथे साजन समाधान चव्हाण वय वीस वर्षे आमच्याकडे वडीलोपार्जित पाच एकर कोरडवाहू शेती असून मागील काही वर्षापासून सततची नापिकी व वडीलोपार्जित तीन लाखापेक्षा जास्त बँकांचे व खाजगी कर्जाचा डोंगर असून तो कर्जाचा डोंगर दरवर्षी वाढत आहे. त्यातच दोन एकर जमीन खाजगी सावकाराकडे

**–३ लाखाचेवर बँक व खाजगी सावकाराचे कर्ज असल्याची माहिती**
**–बहिणीचे लग्नाच्या आर्थिक विवंचनेत**

गहाण असल्याचे नातेवाईकांनी सांगितले.

व वडील जन्मजात दिव्यांग असून बहिणीचे लग्न ठरल्याने एकंदरीतच मानसिक रित्या दुर्बल होऊन आर्थिक विवंचनेत असलेल्या एकुलता एक असलेला शेतकरी पुत्र साजण चव्हाण यांने १६ जानेवारी २०२६ रोजी रात्री आठ वाजताची सुमारास शाळेच्या जवळ विषारी औषध पिल्याने एकच खळबळ उडाली होती. तातडीने अकोला जिल्हा सर्वोच्च रुग्णालयअकोला येथे दाखल करण्यात आले.

डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले असून शनिवारी उत्तरीय तपासणीनंतर त्यांच्या मूळ गावी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या कुटुंबाला शासनाने तातडीने आर्थिक मदत देण्यात येईल अशी मागणी नागरिक करीत आहे.त्याच्या पश्चात आई ,वडील ,एक बहीण, असा आप्त परिवार आहे.

# कर्ता हनुमान मंडळाच्या वतीने झाले आरोग्य शिबीर




■अकोला,दि.१८ (प्रतिनिधी)■
कर्ता हनुमान मंडळ अकोलाच्या वतीने तर रविवारी आरोग्य शिबीर राबविण्यात येते. गेल्या १५ वर्षापासून हा उपक्रम राबविण्यात येते आहे. आज दिनांक १८/१/२५ रोजी सकाळी ८ ते १० राबविण्यात येते या मध्ये ऐकून ८७ गर्जूनि फायदा घेतला या मध्ये डॉक्टर विवेक गोतमारे बालरोग तज्ञ यांनी १६ पेशन्ट तापवून त्यांना औषधओपचार केला तर २ रुग्ण मोतीबिंदू शस्त्र कीर्य साठी दमानिया मध्ये नेण्यात पाठविण्यात आले तेथे त्यांचे डोळ्याचे ऑपरेशन करण्यात येईल तर डॉक्टर तेजराव नराजे यांनी ७० रुग्ण तपासून औषधओपचार केला तर डॉक्टर प्रकाश मेटागे यांनी ९ रुंग तपासणी केली पुढल्या रविवारी आयुर्वेदिक तज्ञ डाक्टर राजेश बोन्डे येणार असून आजच्या शिबीर मध्ये औषधी वितरण मध्ये ज्ञानदेव बदरखे, गजानन धरमकर यांनी सेवा दिली तर विठ्ठल चिकटे संजय वेध यांनी नोंदणी केली कार्यक्रमाचे सूत्र संचालन माजी सैनिक सुभाषराव म्हैसने यांनी केले शिबीर यशस्वी करण्या करिता सौ मंगला म्हैसने, शर्मा बाई, आशा वेध, संजय बहाळ, हिमंतराव पोहरे, चंद्रकांत ताठे, गजानन माळी, मुरलीधर आवटे, संतोष जाधव, दत्ता वेध, संजय देशमुख, विलास आगरकर आदि उपस्थित होते.


### ॲट्रॉसिटी गुन्ह्यानंतरही आरोपी फरार

**अकोला :** अनुसूचित जातीतील महिलेच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात विनयभंग व जातीय अत्याचाराचा गंभीर गुन्हा दाखल होऊनही आरोपी गोपाळ रामकृष्ण दांदळे दि. १ जानेवारीपासून फरार आहे. ॲट्रॉसिटी ॲक्टसह २०२३ मधील गंभीर कलमे लागू असतानाही अद्याप अटक न झाल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

## अकोली जहागीर येथे हनुमान शंकरपटाचे आयोजन

▪अकोट,दि.१८ (प्रतिनिधी)▪

अकोली जहागीर अंबाडी दिवठाणा पणज पंचक्रोशीतील शंकरपट बैलजोडी मालक व शौकीनांसाठी वीस वर्षांपासून शंकरपट व्यवस्थापक रामभाऊ वाडोकार यांच्या सहकार्याने १८ ते २० जानेवारी पर्यंत हनुमान शंकर पटायचे आयोजन करण्यात आले आहे.शंकर पटाचे उद्घाटक माजी आमदार संजय गावंडे, प्रमुख पाहुणे मंगेश चिखले, दिलीप बोचे, नवनीत लखोटीया, सरपंच संजय कासदे, श्याम गावंडे, रामदास ठाकरे, नरेंद्र काकड, शिवाजी देशमुख, विजय दातीर, केशव जायले, अंभीर मोरे, दामोदर सरोदे, जसराज बहाळे, अमोल बदरखे, दीपक जायले, सुभाष सरोदे, प्रफुल बदरखे ज्ञानेश्वर मानकर, भाऊराव सोनोने, शंकर पट बक्षीस वितरण संग्रामभैय्या गावंडे, महेश गणगणे, अविनाश जायले, उमेश जायले, किशोर वडदकार, पंच कमिटी पट महर्षी रामाभाऊ वाडोकार, विजय मेतकर, दिलीप शेंडे, ऋषिकेश वाढोकर, सुनील डांगटे, विनायक इंगळे, पांडुरंग डांगटे, अरविंदगाडगे, दामोदर सरोदे, इत्यादींची उपस्थिती राहील. नियम व अटीचे पालन करावे लागेल. जीविताची जबाबदारी त्यांच्यावर राहील, पंच कमिटीचा निर्णय अंतिम राहील, काही कारणास्तव कार्यक्रमात बदल करण्यात येईल, एका जोडीला एकच नंबर दिल्या जाईल, पटाचे नियम नेहम ीप्रमाणे राहतील. उल्हास दाभाडे यांच्या धावपट्टी घड्याळ काटा नेतृत्वात राहील, अ गट पहिले बक्षीस संग्रामभैय्या गावंडे ३१००० हजार रु., दुसरे बक्षीस महेश गणगणे, जसराज बहाळे २१००० हजार रु. अ गटाकरिता. एकूण १५ बक्षीस जाहीर केले आहेत. क गट पहिले बक्षीस २१००० हजार रु. रामदास ठाकरे डांगरखेड माजी तहसीलदार, २ रे बक्षीस ११००० हजार रु. संजय गावंडे शाम



गावंडे, ३ रे बक्षीस ५१०० रु. विकास देशमुख, क गट करिता एकूण विविध १५ बक्षीस जाहीर केल्या आहेत, अगट स्पर्धकांना गोल्डन ढाल, तर क गटाकरिता सिल्वर कप निसर्ग ॲग्रो एजन्सी तर्फ आकोट देण्यात येईल, गावगाडा गट पहिले बक्षीस ११००रु. ज्ञानेश्वर मानकर, भैय्यूजी महाराज आश्रम पोपटखेड, २ रे बक्षीस ५०००रु. दिनेश बोचे पत्रकार, गावगाडा गटाकरिता एकूण १२ बक्षिसे जाहीर केले आहे. यावेळी कार्यकर्ते कधीर भाई, सलीम भाई, अंकुश रणगिरे, संतोष धांडे, अनिल कांबळे, संतोष दातीर, संदीप शेळके, नागेश जायले, कुणाल दामोदर, उमेश सोनोणे, अनिल लव्हाळे, गोपाल शेंडे, गोपाल कैकाडी दिगंबर कैकाडी, ज्ञानेश्वर खन्नाडे सहकार्य करीत आहेत. सर्व जोडी मालकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन पट व्यवस्थापक रामाभाऊ वाडोकार यांनी केले आहे.

## महावितरण एक्शन मोडवर शंभर टक्के थकबाकी वसुलीचे लक्ष्य

### दर्जेदार वीज सेवेसाठी ठोस पावले

▪अकोला,दि.१८ (प्रतिनिधी)▪

अकोला परिमंडळातील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक तसेच इतर सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांकडून जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीत चालू वीजबिलांची १०० टक्के वसूली करण्यासह एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीतील २३४ कोटी रुपयांची थकीत वीजबिले पूर्णतः वसूल करण्याचे उद्दिष्ट महावितरणने निश्चित केले आहे. यासोबतच ग्राहकांच्या सर्व प्रलंबित तक्रारी निकाली काढून वीज सेवेत गुणवत्ता वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी 'मिशन ९० दिवस' उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देत वरिष्ठ अधिकारी ते शेवटच्या कर्मचाऱ्यांपर्यंत सर्वांवर जबाबदारी निश्चित करण्यात आल्याचे स्पष्ट केले. कामात दिरंगाई, हयगय किंवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.वीजबिलाची वसूली ही केवळ आर्थिक बाब नसून त्यावरच महावितरणचे



अस्तित्व आणि सेवा अवलंबून असल्याचे नमूद करत, थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत.शासकीय आस्थापना, सार्वजनिक सेवा संस्था, उच्चदाब वर्गवारीतील ग्राहक तसेच मोठ्या थकबाकीदारांकडून वीजबिल वसुलीसाठी अधीक्षक अभियंता ते तंत्रज्ञांपर्यंत सर्वांना ठोस उद्दिष्टे ठरवून देण्यात आली आहेत.या उपक्रमाअंतर्गत वीज वाहिन्यांमधील तांत्रिक बिघाड कमी करणे, ट्रान्सफॉर्मर फ ेल्युअरचे प्रमाण घटवणे, लो–व्होल्टेज व वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या तक्रारी तातडीने निकाली काढणे, तसेच मीटरिंग, बिलिंग आणि कलेक्शन प्रणाली अधिक सक्षम करणे यावर भर देण्यात आला असून तांत्रिक सुधारणेसाठी कृति आराखडा तयार करण्याचे निर्दे श देण्यात आले आहे.

वितरण हानी कमी करण्यासाठी पुढील तीन महिने वीज चोरीविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार आहे. दंडात्मक कारवाईनंतरही वीजचोरीचे बिल न भरणाऱ्या ग्राहकांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असून, मोहिमेला विरोध करणाऱ्या भागात पोलिसांच्या मदतीने कारवाई केली जाणार आहे. वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने वीजपुरवठा तसेच इतर सर्व तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. 'मिशन ९० दिवस' उपक्रमांतर्गत सध्या प्रलंबित असलेल्या सर्व तक्रारींचा वेळेत व प्रभावी निपटारा करण्याचे निर्देश मुख्य अभियंता यांनी सर्व क्षेत्रिय कार्यालयांना दिले आहेत.

# चान्सलर्स ब्रिगेड'चे कृषि विद्यापीठात आयोजन!

### राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी–विद्यार्थिनी गिरवितायत आपत्कालीन व्यवस्थापनाचे धडे!

▪अकोला,दि.१८ (प्रतिनिधी)▪

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा. आचार्य देवव्रत यांचे मार्गदर्शनात महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठातील (कृषी व अकृषी) विद्यार्थ्यांम ध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होण्यासोबतच कौशल्य व नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी तसेच अचानक घडणाऱ्या नैसर्गिक अथवा मानवनिर्मित घटनांमुळे होणारी जीवितहानी, मालमत्तेचे नुकसान व सामाजिक अव्यवस्था टाळण्यासाठी राज्यातील विविध महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, कर्तव्य आदींची जाण अधिक भक्कम करणेसोबतच त्यांना कोणत्याही विपरीत परिस्थितीला सामोरे जाणेसाठी व पर्यायाने स्वतः सह सम ाजहितासाठी तत्पर राहणे साठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सक्षम स्वयंसेवकांची प्रशिक्षित फौज निर्माण करण्याचे हेतूने 'महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिर आव्हान (चान्सलस ब्रिगेड) २०२५–२६' या सात राज्यस्तरीय दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचे आयोजनाची जबाबदारी अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाकडे देण्यात आली आहे.

दिनांक १७ ते २४ जानेवारी २०२६ दरम्यान विद्यापीठाच्या अकोला येथील मुख्यालयी आयोजित 'महाराष्ट्र राज्य अंतर विद्यापीठ आपत्तीपूर्व तयारी प्रशिक्षण शिबिराचे' उदघाटन १७ नंतर लगेचच



कृतीयुक्त प्रशिक्षण कार्यक्रमाला सुरुवात झाली. यामध्ये सर्वप्रथम आपत्ती व्यवस्थापन म्हणजे काय आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण पथकाचे आपत्कालीन परिस्थितीत व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन झाले. दुपारच्या सत्रात लँड स्लाईड रेस्क्यू ऑपरेशन, वैयक्तिक आणि परिवाराची आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षा, सामुदायिक ठिकाणी आपत्ती व्यवस्थापन, भूकंप, वीज पडणे, चक्रीवादळ, भूस्खलन, जंगलातील वणवा आदी प्रसंगी कांय करावे आणि कांय नाही त्यावर कृतियुक्त मार्गदर्शन करण्यात आले. तर आज शिबिराचे दुसरे दिवशी सकाळी योगा, प्राणायाम, कवायत नंतर रुग्णाची काळजी, अत्यवस्थ रुग्णांना सीपीआर देऊन त्याचा जिव वाचवीण्याचे कौशल्य अवगत करण्यात आले. दुपारचे सत्रात कृतियुक्त प्रशिक्षण देत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यात आले.

सदर प्रशिक्षण राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन पदकाची टीम देत असून त्यांचे कडील शस्त्र सज्जता आणि आपत्कालीन परिस्थिती वापरावयाची साधने यांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांचे आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

## थोडक्यात

### वर्षभरात १६० शेतकऱ्यांनी संपवले जीवन

**अकोला :** जिल्ह्यात वर्षभरात विविध कारणांमुळे १६० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी ५६ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरली असून, ४९ प्रकरणांवर अपात्र असल्याचे समोर आले. ६३ प्रकरणांम ध्ये फेर चौकशी सुरू आहे. दरम्यान नवीन वर्षात काही दिवसांपूर्वी झालेल्या शेतकरी आत्महत्याग्रस्त समितीच्या जिल्हास्तरीय बैठकीत शेतकरी आत्महत्याच्या २० प्रकरणांवर चर्चा झाली. यापैकी निकषात न बसणाऱ्या एक प्रकरणाला अपात्र ठरवण्यात आले. अन्य १९ प्रकरणे पात्र असल्याचा निर्णय घेण्यात आला. निसर्गाच्या लहरीपणामुळे सततची नापिकी, घटते उत्पादन व वाढता उत्पादन खर्च, खासगी सावकार, वित्तीय संस्था, बँकेकडून घेतलेले कर्ज यासह इतर कारणांमुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. गतवर्षी कर्जाचा डोंगर वाढतच असून, तो प्रमाणे यंदाही अतिवृष्टीमुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले परिणामी शेतमालाचे उत्पादन प्रचंड घटले असून, शेतमालाला भावही योग्य मिळत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील आत्मत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहे. आत्महत्या करणाऱ्या या शेतकऱ्यांना मदत प्रदान शासनाकडून करण्यात येते. पात्र शेतकऱ्यांचे प्रकरण निश्चित करण्यासाठी शेतकरी आत्महत्याग्रस्त समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. बैठकीत २० प्रकरणे ठेवण्यात आली. त्यापैकी १९ प्रकरण शासकीय मदतीसाठी पात्र करण्यात आले, एक प्रकरण अपात्र ठरले. जिल्हास्तरीय समितीची बैठक जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी समितीच्या सर्व सदस्यांची उपस्थिती होती. बैठकीत भगवान चक्रनारायण (रा. पाभवानी, ता. बाशीर्टाकळी), रमेश आखरे (रा. चिखलगाव, ता. अकोला), गोपाल कांगटे (रा. घुसर, ता. अकोला), रवींद्र वानखडे (रा. खापरखेड, ता. तेल्हारा), चेतन वानखडे (रा. वारखेड, ता. अकोला), राहुल कासमपूर, ता. वानखडे (रा. कासमपूर, अकोला), ईश्वर धनवे (रा. भौरद, ता. अकोला), अरविंद भांबेरे (रा. घामना, ता. अकोला), नारायण कळकार (रा. खिरपुरी, ता. बायपुर), साहेबराव तायडे (रा. हिंगणा निंबा, ता. बाळापूर), अभिलाष मिल्खे (रा. सिरसो, ता. मूर्तिजापूर), अजय वाघ (रा. मोरगाव सादीजन, ता. बाळापूर), शंकर गाडेकर (रा. टाकळी, ता. बाळापूर), बासुदेव लाख (रा. मोरगाव सादीजन, ता. बाल्यपूर), भारत ननिर (रा. कारली, ता. मूर्तिजापूर), प्रितम डाखोरे (रा. पांगरताटी, ता. पातूर), गजानन डाबेराव (रा. सस्ती, ता. पातूर), रूपेश राठोड (रा. गावंडगाव, ता. पातूर), गजानन नाईक (रा. दहिगाव गावंडे) यांची प्रकरणे सादर करण्यात आली.

## तेल्हारा तालुक्यात अवैध धंद्यांचे पेव,पोलिसांची हतबलता

▪तेल्हारा,दि.१८ (प्रतिनिधी)▪

शहरासह तालुक्यात सध्या अवैध धंद्यांनी सीमा ओलांडली असून जुगार, वरली मटका आणि दारूच्या अड्ड्यांनी ग्रामीण भागाला

विळखा घातला आहे. विशेष म्हणजे, हे सर्व अड्डे आणि त्यांची ठिकाणे पोलिसांना माहित असूनही, केवळ थातूर–मातूर' कारवाई करून वेळ मारून नेली जात असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, जेव्हा नागरिकांचा दबाव वाढतो तेव्हा पोलीस काही ठिकाणी छापे टाकल्याचे नाटक करतात. मात्र, या कारवाईत केवळ किरकोळ मुद्देमाल जप्त केला जातो किंवा 'अर्थपूर्ण' तडजोडी करून मुख्य सुत्रधारांना मोकळे रान दिले जाते. पोलीस येतात, थातूर–मातूर पंचनामा करतात आणि निघून जातात, त्यानंतर काही तासांतच अड्डे पुन्हा जोमाने सुरू होतात. या प्रकारा मुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तेल्हारा शहरातील भर रस्त्यांवर सुरु असलेले दारू, वरली मटका, गांजाचे अड्डयांमुळे शाळेमध्ये ये जा करणाऱ्या विद्यार्थ्यावर याचा वाईट परिणाम होत असतांना सुद्धा यावर कोणी लक्ष देण्यास तत्पर दिसत नसल्याचे चित्र सध्या तेल्हारा शहरात पहावयास मिळत आहे.

तालुक्यातील कोणत्या गावात कुठे दारू गाळली जाते आणि कोणत्या कोपऱ्यावर मटक्याचे आकडे घेतले जातात, याची इत्यंभूत माहिती स्थानिक बीट जमादारांपासून ते वरिष्ठ स्तरापर्यंत सर्वांना आहे. तरीही ठोस कारवाई का होत नाही? हा चर्चेचा विषय ठरत आहे. वरिष्ठांचे आदेश आहेतठ असे सांगून कडक कारवाई टाळली जाते की यामागे काही 'मोठे आर्थिक साटेलोटे' आहे, अशी शंका आता व्यक्त केली जात आहे. ठोस कारवाई होत नसल्याने अवैध धंदे चालवणाऱ्यांचे मनोबल वाढले आहे. पोलिसांच्या नाममात्र कारवाईची भीती गुन्हेगारांना उरलेली नाही. उलट, तक्रार करणाऱ्या नागरिकांनाच धमकावण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे तालुक्यात शांतता व सुव्यवस्था धोक्यात आली असून सामान्य जनता भयभीत आहे. स्थानिक पोलीस प्रशासन ढिम्म असल्याने आता अकोला जिल्हा पोलीस अधीक्षकांनीच या प्रकरणात लक्ष द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. तेल्हारा तालुक्यातील या अड्डयांवर विशेष पथकाद्वारे धाडी टाकून कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## गौड ब्राह्मण समाज आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी

▪अकोला,दि.१८ (प्रतिनिधी)▪

अकोला गौड ब्राह्मण समाज व श्री रामदेवबाबा श्यामबाबा सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक गीता नगर येथील रामदेवबाबा श्यामबाबा मंदिरात आरोग्य तपासणी शिबिर मोठ्या उत्साहात यशस्वीपणे संपन्न झाले.

या शिबिरात श्रीकृष्ण पॅथॉलॉजी लॅबच्या वैद्यकीय सेवकांनी सीबीसी, रक्तातील साखर, किडनी व लिव्हर फंक्शन टेस्ट, व्हिटॅमिन, थायरॉईड प्रोफाइल, लिपिड प्रोफाइल, कॅल्शियम व लोखंडाची कम तरता यासह अनेक आवश्यक तपासण्या केल्या, ज्याला प्रखर प्रतिसाद मिळाला. नोंदणीकरणात पंकज विजय शर्मा शास्त्री, किशोर डोलिया, सौ. राजश्री अरुण शर्मा यांनी सहकार्य केले. आभार राजकुमार शर्मा बालाजी यांनी मानले. या वेळी शिबिरात डॉ. प्रियेश शर्मा, डॉ. डी. एम. तोष्णीवाल, डॉ. गौरव शर्मा, डॉ. तुषार जैन, डॉ. श्याम पंडित, डॉ. पारेख, डॉ. विजय शर्मा आदि उपस्थित राहून या उपक्रमाचे कौतुक केले.

## एकल महिलांचा हळदी कुंकू कार्यक्रम संपन्न



▪अकोट,दि.१८ (प्रतिनिधी)▪

साऊ एकल समिती महाराष्ट्र चे निमंत्रक श्री हेरब कुलकर्णी, तसेच अकोला जिल्हा समन्वयक तुषार हांडे सर, यांच्या मार्गदर्शनाखाली एकल महिलांचा समावेश करून, साऊ एकल समितीच्या कार्यरत श्रीमती अनिता काळबांडे यांनी दिनांक १७/१/ २०२६ हळदी कुंकू समारंभाचे आयोजन केले, हळदीकुंकू समारंभ मोठ्या आनंदात, हर्ष–उल्हासात, हास्याचे फुलारे फुलवून पार पडला, कार्यक्रमाला समता परिषद विदर्भ अध्यक्षा सौ मायाताई इरतकर, माळी महासंघाच्या महिला आघाडी अध्यक्षा श्रीमती प्राध्यापक कल्पनाताई तायडे, क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले पतसंस्था अध्यक्षा उमरी सौ शारदाताई धनोकार,सौ प्रणिताताई सम्रीतकार, श्रीमती छायाताई हाडोळे यांची प्रामुख्याने उपस्थिती लाभली, तसेच ऑडवोकेट सविता खोटरे यांनी महिलांना कायद्यासमवेत आपले हक्क यावर उपदेश दिला,समारंभाला साऊ एकल समितीच्या सदस्या ममता जेरेपोतवार उपस्थित होत्या.

## महान समाजसेवी जयप्रकाशजी पांडे यांचा सत्कार संपन्न

▪अकोट,दि.१८ (प्रतिनिधी)▪

समाजामध्ये काही असे समाजसेवी असतात की ज्यांचे संपूर्ण आयुष्य समाजाच्या भल्यासाठीच खर्ची पडत असते. समाजसेवा हीच त्यांच्या जीवनाचं जणू उद्दिष्ट असते. आपली प्रतिभा, वाणी ,समय, धन सर्वकाही समाजसेवेसाठी त्यांनी वाहिलेले असते.समाज सेवेतच ते आनंदाचा अनुभव करतात. परंतु एवढे सर्व करीत असताना स्वतःला प्रसिद्धी पासून दूर ठेवतात.मानसन्मान, पारितोषिके, हार, फुले कधी स्वीकारत नाहीत.आपले कार्य मात्र सतत सुरू ठेवतात.अकोट शहरांम धल असंच एक महान व्यक्तिमत्व म्हणजे जयप्रकाशजी पांडे.

जयप्रकाश जींचा परिचय अकोट शहराला करून देण्याची गरज आहे असे म ला वाटत नाही. अकोट शहरांमधलं कुठलंही समाजकार्य असो धार्मिक अध्यात्मिक कार्य असो त्यामध्ये जयप्रकाशजींचा सहभाग असतो तरुण मंडळी पासून तर ज्येष्ठ बुजुर्ग मंडळी पर्यंत सर्वच जण जयप्रकाश जी व त्यांच्या कार्याला ओळखतात.किंबहुना असे म्हणता येईल की कोणत्याही सामाजिक कार्याची सुरुवात करताना सर्वात प्रथम आठवणही जयप्रकाश जी ची होते अकोट मध्ये सर्व सेवाभावी संघटनांना जयप्रकाश



जी यांनी नेहमी सकारात्मक प्रतिसादातच दिला आहे. मग ते गायत्री परिवाराचे कार्य असो की गोरक्षण चे कार्य असो कुठलीही मोठे आयोजन असो राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे कार्य असो की 'आजादी का अमृत महोत्सव' अथवा अन्य कुठलीही लोकसेवी कार्य असो जयप्रकाश जी त्यामध्ये सहभागी असतात गायत्री परिवार अकोट व गोरक्षण संस्था अकोट यांच्या पदाधिकाऱ्यांनी मोठा आग्रह करून स्वागत स्वीकारण्यासाठी त्यांना राजी केली व त्यांचा सत्काराचा कार्यक्रम श्री नरसिंग महाराज झोपडी येथे साजरा करण्यात आला. गायत्री परिवार व गोरक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष कुंजीलालजी कोठारी यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला एक कुंडी गायत्री यज्ञ,भोजन प्रसाद इ.कार्यक्रम त्यानिमित्ताने आयोजित करण्यात आले. कार्यक्रमास गायत्री परिवार अकोट चे प्रमुख दादारावजी गावंडे,श्री नरसिंग महाराज झोपडी संस्थेचे प्रमुख गजानन भाऊ हागे गायत्री परिवाराचे सर्व परिजन बंधू भगिनी,अकोट मधील गणमान्य व्यक्ती,गोरक्षण संस्थेचे पदाधिकारी व इतर बरेच जण हजर होते.कार्यक्रमाचे संचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन गणेशजी करूले यांनी केले. सर्वांनी भोजन प्रसादाचा आनंद घेतला व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### कुणबी समाज विकास मंडळाच्या वतीने सोयरिक पुस्तिका प्रकाशन व सत्कार समारंभ



अकोला जिल्हा कूणवी समाज विकास मंडळ रजि न५८४ च्या सयूक्त विद्यमाने जिल्ह्यातील ऊपवर मूलामूलीचे ऋणानूंबंध सोयरीक पुस्तकाचे प्रकाशन व कुणबी समाजातील नव्यानेज नगरपालीका व महानगरपालीकेत समाजाचे निवडून आलेल्या नगरसेवकाचा सत्कार सभारंभ आज दिनांक १८/१/२६ ला स्व कीसनराव सोनोने मंगल कार्यालय गोरक्षण रोड अकोला च्या सभागृहात मंडळाचे अध्यक्ष डॉ बाबुराव शेळके याचे अध्यक्षते खाली व कार्याध्यक्ष संजय बागलकर,श्रिंकात ढगेकर, कीशोरजी ठाकरे यांचे ऊपस्थितीत सपन्न झाला यावेळी हिवरखेडच्या नगराध्यक्षा सौ सूलभाताई रमेश दुंतोंडे, अकोला मनपा मधे निवडुन आलेल्रा मंजुशाताई शेळके, हिवरखेड मधील दिपीका संदीपराव ईगळे, सौ अनिताताई रवीद्रजी वाकोडे, तेल्हारा नगरपालिके मधे गजाननराव गायकवाड, व कैलासभाऊ ढोकणे, ईत्यांदीचा सपत्निक सत्कार मंडळाचे पदाधिकर्यािचे हस्ते करन्यात आला तसेच ऊपवर वधू सोयरीक पुस्तीकेचे प्रकाशन सुद्धा या वेळी करन्यात आले


RNI NO-46973/1986 Mahasagar Akola

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak, **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, मिला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**

**स्थानिक संपादक : *पुरुषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९*** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# देवाभाऊंना मानावचं लागेल!

एकेकाळी काँग्रेस पक्षात अशी काही माणसं होती की त्यांचे राजकारण समाजाला सहज समजत असायचे. सर्वांत आधीचा काळ निस्पृह राजकारणाचा होता. त्यात वसंतराव नाईक यांच्यापासून ते वसंतदादा पाटील यांच्यापर्यंत राजकारण सरळ असायचे. शरद पवारांची महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वोच्च अशा प्रकारची 'एन्ट्री' झाली, पण त्यानंतर राजकारणाचा एकूण पोतच बदलला. आयाराम गयाराम संस्कृतीचा उदय झाला व तो फोफावला. आता तर कोणती व्यक्ती कोणत्या पक्षात आहे, हे डोकं खाजवून शोधावं लागतं. विशेष म्हणजे ज्या पक्षात प्रवेश केला, त्या पक्षाचे आपण किती कट्टर आहोत, हे दाखविण्यासाठी ते कोणत्याही थराला जाऊ पाहतात. राज्यातीलच एखादं उदाहरण द्यायचं झालं तर नारायण राणे आणि त्यांची मुलं. संपूर्ण हिंदुस्थानात त्यांच्याइतके कट्टर हिंदुत्ववादी शोधून सापडणार नाही. असो, प्रत्येक राजकीय पक्षाचं आपापल्या ठिकाणी बरं चाललं होतं. परंतु शिवसेनेतून दगाफटका करून एकनाथ शिंदे यांनी महाराष्ट्राच्या राजकारणाचा एकूण खेळच बिघडवून टाकला. त्याचा पुरेपूर लाभ देवेंद्र फडणवीस व पर्यायाने भाजपाने घेतला. संपूर्ण देशात मित्राच्या गळ्यात हात घालून सुरुवातीला त्याला गोडधोड खाऊ घालणे आणि कालांतराने सर्व वसूल करणे, हा प्रकार आलाच. त्यानुसार एकेकाळी एकसंघ शिवसेनेच्या गळ्यात हात घालून तिचे संपूर्ण कंबरडे मोडण्याचा कार्यक्रम भाजपने जवळपास यशस्वी केला. त्याचे दूरगामी परिणाम आता दिसायला लागले आहे. मुंबई महापालिकेत भारतीय जनता पक्षाला एकनाथ शिंदे यांच्या मदतीने एक मराठी माणसांचा पक्ष संपविण्यासाठी मोलाची मदत झाली. राजकीय दृष्ट्या एकनाथ शिंदेंना नक्की यश आले, असे त्यांना वाटत असेल. परंतु मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या एका खेळीने मुंबई व पुण्यात एका दगडात काका पुतण्याचाही गेम होऊन गेला. मराठ्यांना दुहीचा शाप आहे म्हणतात तेच खर! अजितदादा पवार व एकनाथ शिंदे यांनी यातून काय कमावलं? हा एक वेगळा विषय होवू शकतो. बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवारांनी मोठ्या कष्टान उभारलेली, जपलेली मुंबई, पुणे ही शहर या दोघांच्या 'भन्नाट' राजकारणाने दिल्लीश्वरांच्या ताब्यात गेल्यातच जमा आहे. जे शिवरायांच्या काळात सरदार फितूर झाले आणि मराठी मुलखावर मुघलांनी राज्य केले, तिच परिस्थिती आज महाराष्ट्रावर आली. त्याला कारणीभूत हीच नेते मंडळी आहे, असा सूर हतबल मराठी माणूस व्यक्त करतांना दिसत आहे. निवडणुकीचे निकाल लागले असल्याने सर्व छोट्या मोठ्या गोष्टी, पैसे सापडणं, शाही पुसट असणं, दुबार मत, मतदान यादीत नांव नसणे, अशा सर्व गोष्टींवर पडदा पडून जातो. तक्रारी होतात, तक्रारींचे काही पुढे होतं नाही. पैसे किती सापडतात, त्याचं काही होत नाही. किती वाटले जातात, त्याचं काही होत नाही. याचा अर्थ फक्त निकाल लागल्यावर सर्व गुन्हे माफ होऊन जातात. लोक गुलाल उधळतात, त्या गुलालामध्ये सगळं काही पुसलं जातं. दादांनी तर सत्तेच्या व दिल्लीकरांच्या नादात पहाटे शपथविधी करून काकाने स्वतःच्या हिंमतीवर उभा केलेला पक्ष संपविण्याचा पाया रचला होता व कालांतराने संधी मिळताच पक्ष संपविण्याची सुरूवात केली आणि शेवटी स्वतःही संपल्यातच जमा आहे. एकनाथ शिंदे ना तोंड झाकायला निदान ठाणे तरी आहे. पण अजितदादांना पुण्यातही तोंड दाखवायला जागा ठेवली नाही. मात्र दिल्लीकर त्यांच्यावर खुशच असतील. एका दगडात काका पुतण्याच्या गेम कुणी केला? हे झालं दादांचं, पण एकनाथ शिंदेंचं काही वेगळं आहे अशीतली गोष्ट नाही. त्यांच्या काही गोष्टींची मेख दिल्लीकरांच्या अशा प्रकारे ताब्यात आहे की, त्यांनी सांगितल्याशिवाय त्यांना पाऊलच टाकता येत नाही. मुंबई महापालिकेत भाजपला सहकार्य करून ठाकरे बंधूंना थोपविण्यासाठी त्यांची भूमिका मोलाचीच ठरली आहे. ही सर्व किमया देवेंद्र फडणवीस नावाच्या जादूगारांनेच केली आहे. म्हणून 'मानावचं लागेल देवाभाऊला'!





जे लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतही झालं नाही, असं राजकारण आता महापालिकांच्या निवडणुकांत झालं आहे. जेव्हा महाविकास आघाडीची व महायुतीची स्थापना झाली आणि तीन वेगळ्या विचारांचे पक्ष एकत्र आले, तेव्हा असं म्हटलं गेलं की सामान्यांचा राजकारणावरील विश्वास उडावा, असे बदल आता होत आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल आणि महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काही ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची युती करण्याचं घाटत आहे. अजितदादांच्या राष्ट्रवादीची भाजपसोबत युती आहे. त्यामुळं पटेल आणि तटकरे यांनी या नव्या युतीचा विषय शहा यांच्या कानावर घातला.

यावर चर्चा झाली. त्यावेळी अशी युती करण्यास शहा यांची काहीच हरकत नसल्याचं सांगण्यात आलं. तर दुसरीकडं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजितदादांच्या राष्ट्रवादीसोबतची युती तुटत असल्याचं पुण्यात सांगितलं होतं. त्यावरही चर्चा झाली. यावर शहा यांनी या सर्वच विषयांवर भाजपच्या महाराष्ट्रातील नेत्यांसोबत बोलणार असल्याचं पटेल आणि तटकरे यांना आश्वासन दिले होते.

मागील निवडणुकांमध्ये शहा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही शरद पवार यांच्यावर सडकून टीका केली होती.

पुण्यातील एका सभेत बोलताना शहा यांनी पवार यांना भ्रष्टाचाऱ्यांचे सरदार म्हटलं होतं. यावेळी अजितदादा व्यासपीठावर उपस्थित होते. त्याचवेळी लोक बोलत होते की, फार पालापाचोळा झाला आहे राज्याच्या राजकारणाचा. महापालिकेत एकूण शंभर नगरसेवक ओवेसींचे झाले आहेत.

ज्येष्ठ पवार गट संपला आहे. लातूर परभणी पुरती काँग्रेस उरली आहे. पुण्यात दादा ताई भुईसपाट झाले. महाराष्ट्रात भाजपने ज्या पद्धतीने राजकारण केलं ते पाहिल्यावर जर भविष्यात काही व्हायचंच असेल, तर ज्या क्षेत्रात असाल त्या




जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

क्षेत्रातले देवेंद्र फडणवीस व्हा, हाच संदेश आता दिला जात आहे त्यात म्हटले आहे की, कमी बोला, मुद्द्याचं बोला, काहीही विसरू नका, राग असलाच तर तो मनात ठेवा, संधीची वाट पहा, संधी आली की तुटून पडा, जवळचा फायदा बघू नका, लांबचा विचार करा, टीका देखील हसत हसत सहन करा, वेळ प्रत्येकाची येते, वेळ आली की हिशोब चुकता करा, गर्दीचा भाग होऊ नका, स्वतःचे वेगळेपण सिद्ध करा, मगच 'देवाभाऊ' होता येतं.

इतिहास आपल्याला ओरडून सांगतो की, महाराष्ट्र कधीच बाहेरून जिंकला गेला नाही, तो आतून फोडला गेला. मराठी मुलखाला दुहीचा शाप आहे. हे वाक्य आज शिवरायांच्या किल्ल्यांवर कोरून ठेवावं लागेल इतकं खरं झालं आहे !

शिवाजी महाराजांच्या काळात जेव्हा सरदार विकले गेले, तेव्हा मुघलांची तलवार नव्हे तर मराठी फितुरी कारणीभूत ठरली. आज तीनशे वर्षांनी पुन्हा तोच इतिहास नव्या चेहऱ्यांनी, नव्या भाषेत आपल्यासमोर उभा आहे.

स्व. बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांनी महाराष्ट्र घडवला तर तो सत्तेसाठी नाही, तर मराठी माणसाच्या स्वाभिमानासाठी. मुंबईझ्रपुणे ही केवळ शहरे नाहीत, ती मराठी अस्मितेची राजधानी आहे. पण आज काय झालं? दिल्लीसमोर झुकणं हे राजकारण ठरवलं गेलं आणि महाराष्ट्राचं नेतृत्व दिल्लीच्या चरणी अर्पण करण्यात आलं!

आज निर्णय महाराष्ट्रात घेतले जात नाहीत. आज धोरणं दिल्लीत ठरतात आणि मराठी माणूस फक्त भावनिक मुद्द्यांवर फसवला जातो. हे अपयश नाही, हा अपघात नाही, हा सत्तेसाठी केलेला जाणीवपूर्वक विश्वासघात आहे. ज्यांनी स्वतःला वारस म्हणवलं, त्यांनीच वारसा विकला. ज्यांनी शिवरायांचा फोटो लावला, त्यांनीच शिवरायांची विचारधारा गहाण टाकली.

आज महाराष्ट्रात मराठी माणूसच परका वाटतोय आणि बाहेरच्यांची मर्जीच राजकारण ठरवतेय. इतिहासात एक गोष्ट ठाम आहे, ज्या भूमीवर गद्दारी वाढते, तिथे गुलामी अटळ असते. आज महाराष्ट्र गुलाम नाही असं जर कुणाला वाटत असेल, तर त्यांनी आरसा बघावा. कारण गुलामी नेहमी साखळ्यांनी येत नाही, ती कधी कधी युती, रणनीती आणि व्यवहार म्हणून येते.

पण लक्षात ठेवा इतिहास फार संयमी असतो, पण शेवटी निकाल निर्दयी देतो. आज सत्तेत असलेली ही मंडळी कदाचित विजयी वाटत असतील, पण उद्या इतिहासाच्या पानावर त्यांचं नाव फितूरांच्या रांगेत लिहिलं जाईल. त्याचा परिणाम असा झाला की जुनं सगळं मुळीच निघून भाजपा हा महाराष्ट्रातील सर्वात शक्तीशाली पक्ष असल्याचे सिद्ध झाले आहे.

देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे सर्वात मोठे, निर्विवाद, एकमेव आणि न भूतो न भविष्यती नेते असल्याचे सिद्ध झाले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील सर्व मुख्य राजकीय पक्षातील नेत्यांची विचित्र अवस्था केली आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात मुख्यमंत्री पद मिळाल्यापासून त्यांना ज्या कट कारस्थानांचा सामना करावा लागला आहे, त्यामुळे या हसमुख चेहऱ्यामागील सर्वात कुटिल राजकारणी जन्माला आला, असे म्हटले जात असले तरी, त्यापेक्षा देवाभाऊंना महाराष्ट्रातील राजकारणातील चाणक्य म्हटले तर काय वावगे ठरेल?

### भाजप शिवाय झाले 'दादा' व 'नाथ' अस्तित्वहीन

एकनाथ शिंदे आणि अजित पवारांना एका मयार्देच्या पलीकडे देवेंद्र फडणवीस यांना आव्हान देण्याचे धाडस करू देत नाही. ठाकरे ब्रॅंड आकुंचन पावला आहे पण संपला नाही. ठाकरे ब्रॅंडचे असणे एकनाथ शिंदे यांना वेडे साहस करण्यापासून परावृत्त करणारे सिद्ध होणार आहे. अजित पवारांना भाजपाचे पाठबळ नसेल तर आपल्याला एकही महापालिका जिंकता येत नाही याची जळजळीत जाणीव करून देणारे सिद्ध झाले आहे. अजित दादा पवार व एकनाथ शिंदे यांच्यापैकी एकही जण भविष्यात भाजपला किंवा फडणवीसांना आडवा आला तर पक्षाचा मालक कोण ? या केसचा निकाल अद्याप बाकी आहे याची जाणीव करून दिली जाईल. या निवडणुकीतील पराभवामुळे कदाचित दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र येण्याच्या प्रक्रियेस सुरुवात होऊ शकेल. परंतु एकत्रित आलेला पक्ष भाजपच्या मागे उभा राहिला तर ठीक, अन्यथा त्यांचे काही खरे नाही असं नवा निकाल सांगतो.

महापालिका निवडणुकीमुळे अजित पवारांची व एकनाथ शिंदे यांची सौदेबाजी करण्याची क्षमता संपुष्टात आली आहे. या क्षणाला महाराष्ट्रातील सगळे विरोधक एकत्र येऊन सुद्धा भाजपासमोर एकदम थिटे दिसत आहेत. शक्तिशाली झालेला भाजपा आपल्याला केव्हाही चिरडून टाकेल, याची आता सर्वांना जाणीव झाली आहे. शिंदे व पवार भाजपाशिवाय जिंकू शकत नाहीत असे वातावरण आता तयार झाले आहे. सर्वजण भाजपाशिवाय शून्य अवस्थेला पोचले आहेत.

---

# हरवलेले पालकत्व!

सौ. प्रांजली विजय ब्रम्हे
नागपूर.

मागील वर्षी सासऱ्यांना आजारपणामुळे इस्पितळात भरती करावे लागले. आयसीयूमध्ये एक वृद्ध आजी एकट्याच होत्या. त्यांच्या जवळ नात्यापैकी कोणीही नव्हतं. ना मुलगा, ना सून, ना नातवंड. मरणासन्न अवस्थेत होत्या, थोडी चौकशी केल्यावर कळलं की आजी-आजोबांचं वय नव्वदीच्या पुढे आहे. दोघेही आपल्या घरातच राहण्यावर ठाम होते. मात्र मुलं, सुना,नातवंडं नोकरीनिमित्त मोठ्या शहरांत स्थायिक झाली होती. परिणामी आजी आजोबांच्या घरी परिचारिका, घरकाम करणारे स्त्री-पुरुष मदतीला असतात. आजी आजोबांच्या सांभाळ होत होता, पण नात्यांची ऊब नव्हती. पालकत्व होतं, पण ते पैशाने विकत घेतलेलं होतं.

काही दिवसांनी सोशल मीडियावर एक प्री-वेडिंग व्हिडीओ पाहण्यात आला. एका तरुण जोडप्याने आपलं प्री-वेडिंग शूट थेट वृद्धाश्रमात केलं होतं. त्यांनी तिथल्या आजी-आजोबांसोबत दिवस घालवला, फळं नेली, आवश्यक वस्तू दिल्या. जे स्वतः जेवू शकत नव्हते त्यांना आपल्या हाताने खाऊ घातल. त्या वृद्धांच्या चेह?ऱ्यावरचा आनंद मन हेलावून टाकणारा होता. भरभरून आशीर्वाद मिळाले असणार त्या जोडप्याला. व्हिडीओ पाहताना डोळे पाणावले.

मात्र त्याच वेळी मनात एक प्रश्न उभा राहिला आज या तरुणांनी काही तासांसाठी पालकत्व स्वीकारलं, पण उद्या काय? त्या आजी-आजोबांचं रोजचं आयुष्य पुन्हा एकाकीच असणार.

याच दरम्यान आणखी एक हलवा प्रसंग अनुभवला. एका पाळणा घरात कामानिमित्त जाण्याचा योग आला. मला पाहताच एक सव्वा वर्षाची तान्हुली दुडूदुडू धावत आली. तिला वाटलं, आपल्या घरचं कोणी तरी आलं आहे. पण समोर अनोळखी चेहरा दिसताच ती रडू लागली. तिच्या डोळ्यांत भीती होती माझं काहीतरी हरवलंय, माझं कोणीच नाही. तेही पालकत्व होतं, पण ते सुद्धा पैशावर उभं होतं.

पालकत्व हे आयुष्यातलं सर्वांत जिव्हाळ्याचं नातं आहे. जन्म देणं महत्त्वाचं असतंच, पण त्याहून मोठं असतं साथ देणं, आधार बनणं. आज मात्र हे नातं हळूहळू व्यवहारात बदलत चाललं आहे. यामागची कारणंही अनेक आहेत. बदलती जीवनशैली, वाढत्या गरजा, करिअरचा दबाव, स्थलांतर, नात्यातील अहंकार हे सगळं वास्तव आहे. पण बदल स्वीकारताना नात्यांचा गाभा हरवतोय, ही बाब चिंताजनक आहे.

कुठे आई-वडिलांना नोकरीशिवाय पर्याय नसतो. मनावर दगड ठेवून पाळणाघराचा निर्णय घ्यावा लागतो. कुठे करिअरच्या ओढीपोटी वृद्ध आई-वडील गावी एकटे राहतात. कुठे भावंडांमध्ये वाद होतो पालकत्व मी घेणार की तू? लहानपणी ज्यांनी आपल्याला चालायला शिकवलं, त्यांच्यासाठी जबाबदारी घ्यायला मात्र कोणी पुढे येत नाही.

अनेक वेळा वृद्धाश्रमाचा मार्ग स्वीकारला जातो. काही ठिकाणी तर आई-वडील स्वतःच म्हणतात, ह्वतुम्ही तुमचं आयुष्य आनंदात जगा. आमची काळजी तिकडे घेतली जाईल.ह्व पण हे शब्द उच्चारतानाही त्यांच्या मनावर दगड ठेवलेलाच असतो, हे फार थोड्यांना जाणवतं.

आज पालकत्व हरवत चाललं आहे. नात्यांमधला ओलावा कमी होत चालला आहे. माणसं जवळ असूनही भावनिक अंतर वाढत आहे.

हे चित्र बदलण्यासाठी थोडंसं मागे वळून पाहिलं तरी पुरेसं आहे. पुढे जायचंच आहे, प्रगती करायचीच आहे; पण मागचं सगळंच वाईट होतं असं नाही. पूर्वीही स्त्रिया कर्तबगार होत्या. त्यांनी करिअर आणि संसार यांची सांगड कशी घालायची हे शिकून घेतलं होतं. आजच्या पिढीलाही ते शिकणं गरजेचं आहे.

या सगळ्या समस्यांवर एक महत्त्वाचा उपाय म्हणजे एकत्र कुटुंब पद्धतीचा पुनर्विचार. अहंकार बाजूला ठेवून मी पेक्षा आपण महत्त्वाचं मानणं.

आमच्या लहानपणी घरात दोन-दोन आजी-आजोबा असायचे, कुठे आजीची बहीण असायची, तर कुठे आजोबांचे भाऊ. म्हणजे आजी-आजोबां सोबत मावशी आजी, आत्ता आजी, काकु आजी किंवा काका आजोबा, मामा आजोबा असायचे, काही अडले तर भक्कम आधार असायचा. आपोआपच मिळून मिसळून राहणे, मोठ्यांचा आदर करणे, दोषांवर नियंत्रण ठेवणे नकळत संस्कार व्हायचे, नात्यांची ओळख आपोआप होत होती. आज मात्र मुलांना स्वतःचे काका-काकूही नीट माहिती नसतात. नाती कमी होत गेली, तसतसं पालकत्वही हरवत गेलं.

अजूनही वेळ गेलेली नाही. पालकत्व पूर्णपणे संपण्याआधी ते जपण्याची गरज आहे. कारण पुढील पिढी याच संस्कारांवर उभी राहणार आहे.

आदर्श समाज आणि आदर्श राष्ट्र घडवायचं असेल, तर त्याची सुरुवात घराघरांतून, जिवंत पालकत्वातूनच व्हायला हवी. याही पलिकडे आता आई ऐवजी अक कडे पालकत्व जाऊ नये म्हणजे झालं.

■ ■ ■

---

# महाराणा प्रताप : लोककल्याणाच्या सामाजिक कार्याची अमर परंपरा

भारतीय इतिहासाच्या दीर्घ आणि समृद्ध परंपरेत काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे स्मरण केवळ त्यांच्या पराक्रमामुळे किंवा राजकीय संघषार्मुळे मर्यादित राहत नाही, तर त्यांच्या सामाजिक जाणिवा, लोककल्याणाची भूमिका आणि मूल्यनिष्ठ जीवनामुळे ती व्यक्तिमत्त्वे काळाच्या पलीकडे जाऊन समाजमनावर अधिराज्य गाजवतात.

महाराणा प्रताप हे असेच एक अद्वितीय व्यक्तिमत्त्व आहे. स्मृतीदिनानिमित्त महाराणा प्रताप यांचे स्मरण करताना त्यांना केवळ हल्दीघाटीच्या रणांगणावर लढणारा पराक्रमी योद्धा म्हणून पाहणे अपुरे ठरेल. त्यांच्या जीवनाचा खरा अर्थ त्यांच्या सामाजिक कार्यात, प्रजेप्रती असलेल्या निष्ठेत, स्वाभिमानाच्या भूमिकेत आणि लोककल्याणासाठी केलेल्या त्यागात दडलेला आहे. महाराणा प्रताप यांचे संपूर्ण जीवन हे समाजकेंद्रित विचारांचे, मानवी मूल्यांचे आणि स्वातंत्र्याच्या व्यापक अर्थाचे प्रतीक होते.

सोळाव्या शतकातील भारत हा सत्तासंघर्षांचा, साम्राज्यविस्ताराचा आणि सामाजिक उलथापालथींचा काळ होता. मुघल साम्राज्याच्या विस्तारामुळे अनेक प्रादेशिक राज्यांवर परकीय सत्तेचे वर्चस्व निर्माण झाले होते. अकबराच्या काळात अनेक राजांनी मांडलिकत्व स्वीकारून आपले राज्य, वैभव आणि व्यक्तिगत सुरक्षितता जपण्याचा मार्ग निवडला. परंतु महाराणा प्रताप यांनी हा मार्ग नाकारला.

त्यांनी परकीय सत्तेच्या अधीन जाणे म्हणजे केवळ राजकीय पराभव नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक अधःपतन असल्याचे स्पष्टपणे ओळखले. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य म्हणजे फक्त सत्ता नव्हे, तर समाजाचा आत्मसन्मान, सांस्कृतिक अस्मिता आणि मूल्यनिष्ठ जीवन होते.

महाराणा प्रताप यांची सामाजिक भूमिका त्यांच्या प्रजाभिमुख नेतृत्वातून स्पष्टपणे दिसून येते. त्यांनी स्वतःला कधीही प्रजेपेक्षा श्रेष्ठ मानले नाही. राजा म्हणजे ऐश्वर्य उपभोगणारा नव्हे, तर समाजाच्या दुःखात सहभागी होणारा सेवक असतो, हा विचार त्यांनी आपल्या कृतीतून अधोरेखित केला.

संकटाच्या काळात त्यांनी राजवाडे, सुखसोयी आणि वैभवाचा त्याग करून आपल्या प्रजेबरोबर जंगलात, डोंगरदऱ्यांत कष्टाचे जीवन स्वीकारले. हा त्याग केवळ व्यक्तिगत नव्हता, तर समाजाशी असलेल्या त्यांच्या अतूट नात्याचे प्रतीक होता. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हे नेतृत्व लोककेंद्रित सत्तेचे आणि सामाजिक जबाबदारीच्या राजसत्तेचे उत्कृष्ट उदाहरण ठरते.

हल्दीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे आयुष्य अत्यंत कष्टमय झाले. अन्नधान्याची टंचाई, आर्थिक अडचणी, सततचा संघर्ष आणि मुघल सत्तेचा दबाव असूनही त्यांनी आपल्या प्रजेचा त्याग केला नाही. उलट, या प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी समाजाला धैर्य, आशा



आणि आत्मसन्मानाची जाणीव करून दिली. जंगलात राहून त्यांनी जे कष्टाचे जीवन जगले, ते समाजासाठी प्रेरणादायी ठरले. त्यांच्या जीवनातून समाजाला हे समजले की स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्याग, संयम आणि संघर्ष अपरिहार्य असतो.

महाराणा प्रताप यांच्या सामाजिक कार्याचा एक अत्यंत महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचा आदिवासी समाजाशी असलेला घनिष्ठ संबंध. त्या काळात आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहापासून दूर ठेवले जात होते आणि त्यांच्याकडे दुय्यम दृष्टिकोनातून पाहिले जात होते. परंतु महाराणा प्रताप यांनी या समाजाला स्वराज्याच्या संघर्षात समान भागीदार मानले.



डॉ. राजेंद्र बगाटे
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5
@gmail.com

आदिवासी समाजाने महाराणा प्रताप यांना जंगलात अन्न, निवारा, मार्गदर्शन आणि संरक्षण दिले. हे नाते परस्पर सन्मान, विश्वास आणि समानतेवर आधारित होते. महाराणा प्रताप यांनी आदिवासी समाजाच्या श्रमशीलतेचा, निष्ठेचा आणि स्वातंत्र्यप्रिय स्वभावाचा सन्मान केला. त्यामुळे समाजातील वंचित घटक स्वराज्याच्या लढ्यात सक्रिय सहभागी झाले आणि सामाजिक समावेशनाचा एक आदर्श निर्माण झाला.

स्वावलंबन ही महाराणा प्रताप यांच्या सामाजिक विचारांची केंद्रस्थानी असलेली संकल्पना होती.

मुघल सत्तेने मेवाडवर आर्थिक नाकेबंदी केली तेव्हा राज्यात दारिद्र्य, उपासमारीची आणि असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण झाली. अशा वेळी परकीय सत्तेकडून मदत स्वीकारण्याऐवजी महाराणा प्रताप यांनी स्थानिक साधनसंपत्तीचा उपयोग करण्यावर भर दिला.

जंगलसंपत्ती, शेती, पशुपालन, हस्तकला आणि स्थानिक उद्योग यांच्या माध्यमातून समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हा दृष्टिकोन केवळ आर्थिक नव्हता, तर सामाजिक आत्मनिर्भरतेचा आणि स्वाभिमानाचा पाया घालणारा होता. पुढील काळातील स्वदेशी चळवळीच्या विचारांचे बीज या धोरणात दिसून येते.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातील नैतिक मूल्ये त्यांच्या सामाजिक कायार्चा कणा होती. त्यांनी युद्धातही मानवी मूल्यांचे उल्लंघन केले नाही. स्त्रिया, मुले आणि सामान्य नागरिक यांच्यावर अन्याय होणार नाही, याची त्यांनी विशेष काळजी घेतली.

युद्ध जिंकण्यासाठी अनैतिक मार्गांचा अवलंब करणे त्यांनी नाकारले. शत्रूशी लढताना देखील नीती, प्रामाणिकपणा आणि सन्मान यांचा त्याग त्यांनी केला नाही. समाजाला त्यांनी हे शिकवले की उद्दिष्ट कितीही महान असले तरी साधने शुद्ध आणि नैतिक असली पाहिजेत.

स्त्रियांच्या सन्मानाबाबत महाराणा प्रताप यांची भूमिका अत्यंत प्रगत आणि संवेदनशील होती. त्या काळात स्त्रियांना युद्धकैदी बनवणे, अपमानित करणे किंवा त्यांच्यावर अत्याचार करणे सामान्य मानले जात असताना महाराणा प्रताप यांनी अशा कृत्यांना ठाम विरोध केला.

---------------

(उर्वरीत भाग उद्याच्या अंकात)

■ ■ ■

---

# केसांसाठी मेथीचे आरोग्यदायी फायदे



केसांच्या वाढीसाठी मेथीचा टोनर हा एक नैसर्गिक, सुरक्षित आणि प्रभावी उपाय मानला जातो. मेथीच्या दाण्यांमध्ये प्रोटीन, लेसिथिन, निकोटिनिक ॲसिड, लोह आणि ॲंटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे केसांच्या मुळांना पोषण देतात.

मेथीचा टोनर टाळूवर वापरल्यास रक्ताभिसरण सुधारते, त्यामुळे केसांच्या मुळांपर्यंत पोषक तत्त्वे नीट पोहोचतात. यामुळे केस गळणे कमी होते आणि नवीन केसांची वाढ होण्यास मदत मिळते. तसेच मेथीमध्ये ॲंटीफंगल आणि ॲंटीबॅक्टेरियल गुणधर्म असल्यामुळे कोंडा, खाज आणि टाळूवरील संसर्ग कमी होतो, ज्यामुळे केस निरोगी वाढण्यासाठी पोषक वातावरण तयार होते. मेथीचा टोनर केसांना नैसर्गिक मजबुती आणि चमक देतो. नियमित वापर केल्यास केसांचा कोरडेपणा कमी होतो आणि केस मऊ, रेशमी बनतात.

मेथीतील लेसिथिन केसांना खोलवर मॉइश्चर देतो आणि फुटलेली टोकं कमी करण्यास मदत करतो. तसेच हा टोनर टाळूतील अतिरिक्त तेल संतुलित ठेवतो, त्यामुळे अतितेलकट किंवा अतिशुष्क टाळूच्या समस्या कमी होतात. मेथीचा टोनर वापरल्याने केस अकाली पांढरे होण्याची प्रक्रिया मंदावण्यासही मदत होऊ शकते.

भिजवलेल्या मेथीच्या पाण्याचा टोनर म्हणून वापर केल्यास केसांच्या मुळांना थंडावा मिळतो आणि ताणतणाव कमी होतो. आठवड्यातून २ ते ३ वेळा टोनर वापरल्यास चांगले परिणाम दिसून येतात.

**साहित्य :-** 10-20 रुपये किंमतीचे मेथीचे दाणे, रोझमेरीची पाने, वाळलेल्या आवळ्या, अंबाडी बियाणे, नारळ तेल

**कृती :-** हेअर ग्रोथ टॉनिक बनविणे खूप सोपे आहे. यासाठी एका कढईत २ चमचे मेथीचे दाणे घालून त्यात रोझमेरीची पाने, वाळलेली आवळी, अंबाडी यांचा समावेश करावा. यानंतर, त्यात एक ग्लास पाणी घाला आणि सर्व काही चांगले उकळवा. नंतर त्यात 2 चमचे नारळ तेल घाला. आता हे मिश्रण गाळून घ्या आणि एका कंटेनरमध्ये ठेवा, तुमचे हेअर ग्रोथ टॉनिक तयार होईल.

हे हेअर टॉनिक कॉटन वूलवर घ्या आणि केसांच्या मुळांना चांगल्या प्रकारे लावा . याशिवाय तुम्हाला असे वाटते की त्या जागेवरून तुमचे केस कमी होत आहेत, तुम्ही ते तेथेही लावू शकता. यामुळे केसांची वाढ तर वाढतेच, शिवाय केस गळणेही कमी होते. केसांना निरोगी आणि काळे ठेवण्यात देखील हे खूप उपयुक्त ठरते .

■ ■ ■

---

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### मुह मे राम बगलमे..

एकाच टोपल्यात
जमा केले सारे खेकडे
जो तो वरचढ होण्याचा
प्रयत्न करतो पण
बाकीचे ओढती
त्याचे तंगडे..

असाच काहीसा गुंता
राजकारणात झालाय
म्हणवून घेती स्वतःला
छोटा - मोठा भाऊ
पण कृतीमात्र शत्रुसम
एकमेका खाऊ ..!

# माणसासाठी धोकादायक जागा



जगाला कवेत घेण्याची स्वप्न अनेक जण पाहतात. युट्यूब आणि 'सोशल मीडिया'मुळे कमाईचे साधन झाल्याने अनेक जण ट्रॅव्हल व्लॉग तयार करतात. त्यातून कमाई होते आणि अनेक देशात फिरणेही होते. असे अनेक ट्रॅव्हलर्स आपण पाहतो. त्यांच्यामुळे आपल्याला त्या त्या देशाची संस्कृती, भाषा, प्रथा आणि अनेक गोष्टी समजतात; पण जगात अशी काही ठिकाणे आहेत, जिथे जाणे म्हणजे साक्षात मृत्यूलाच आमंत्रण देण्यासारखं आहे. कारण इथे गेलेली माणसे परत आली नसल्याचा दावा करण्यात येतो. जी वाचली त्यांचे अनुभव भयावह असल्याचे सांगण्यात येते.

**नेवाडा वाळवंट**

अमेरिकेतील नेवाडा वाळवंट असेच एक खतरनाक ठिकाण आहे. हे अमेरिकन सैन्याचे एक लष्करी तळ आणि प्रशिक्षण केंद्र पण आहे. येथे वायुदलाचे एक छोटे लष्करी विमानतळ आहे. या प्रदेशात अमेरिका नवीन शस्त्र आणि इतर गोष्टींचा प्रयोग करून पाहतो. अनेक लोकांच्या मते या परिसरात अनेकदा 'यूएफओ' दिसतात. अमेरिकन लष्कराशी त्यांचा संपर्क असल्याचा दावा अनेक जण करतात. येथे एलियनशी संबंधित काही प्रकल्प गुप्तपणे सुरू असल्याचासुद्धा दावा करण्यात येतो. अमेरिकेने हे सर्व दावे अनेकदा फ टाळले आहेत, पण या परिसरात नागरिकांना, पर्यटकांना प्रवेश देण्यात येत नाही.

**सापांचं बेट**

जगातील काही ठिकाणं ही मानवाच्या शक्ती आणि क्षमतेची कसोटी पाहणारी आहेत. त्यातील एक ब्राझीलच्या जंगलातील आहेत. ब्राझीलमध्ये एक सापांचं बेट आहे. कारण या ठिकाणी जगातील सर्वात घातक, विषारी साप राहतात. एखादी व्यक्ती चुकून या बेटावर गेली, तर ती परत येणे अशक्य मानले जाते. स्थानिक लोक आणि ब्राझीलच्या वनपरीक्षेत्रातील अधिकारी या जंगलात जाण्यास पर्यटकांना कायम मनाई करतात. त्यातूनही काही साहसी लोक जेव्हा या बेटावर गेले. त्यातील अनेक जण परत आले नसल्याचे सांगण्यात येते. तर जे परत आले, त्यांनी अत्यंत मोठे साप पाहिल्याचा दावा केला आहे.

**उत्तर सेंटिनल बेट**

नॉर्थ सेंटिनल आयलँड हे भारताच्या अंदमान-निकोबार बेट समूहाचा एक भाग आहे. हा भारताचा केंद्र शासित प्रदेश आहे. येथील स्थानिक लोक अत्यंत आक्रमक आहेत. त्यांचा जगाशी फारसा संपर्क आलेले नाही. ते आजही अश्मयुगात राहिल्या सारखे आहेत. यापूर्वी काही ख्रिश्चन मिशनरी तिथे धर्म प्रसारासाठी पोहचले; पण बेटावर येताच त्यांनी त्यातील अनेकांचा ठार केले. येथील आदिवासी हे बाहेरचा कोणताच पदार्थ, कोणतीच व्यक्ती सहन करत नाहीत. हे आदिवासी आजही अंगाला झाडपाला बांधून राहतात.

# कॅलिडोस्कोप

## अशी ही बॉडी ज्वेलरी

विविध धातूंपासून, धाग्यांपासून, बांबू, ज्यूट, लाकडापासून बनवलेले दागिने आपण घालतो. पण सध्या फॅशनविश्वात दागिन्यांचा अनोखा ट्रेंड लोकप्रिय ठरत आहे. प्राचीन काळात आदिवासी महिला शरीरा झाकण्यासाठी झाडांच्या पानांपासून बनवलेले कपडे, दागिने वापरत असत. हाच ट्रेंड पुन्हा आला आहे. न्यूयॉर्कमधल्या एका फॅशन शो मध्ये अशा प्रकारचे दागिने सादर करण्यात आले. हे दागिने पाहून उपस्थितांनी तोंडात बोटं घातली.



इंस्टाग्रामवर सध्या त्वचेचे दागिने बरेच लोकप्रिय ठरत आहेत. हे दागिने घातल्यावर ते त्वचेचा वापर करूनच बनवले आहेत की काय असं वाटतं. हे दागिने आपल्या त्वचेसोबत अगदी समरस होऊन जातात. प्लास्टिक सर्जरीप्रमाणेच ही ज्वेलरी भासते. न्यूयॉर्कमधल्या फॅशन वीकमध्ये ही ज्वेलरी सादर करण्यात आली. या दागिन्यांना बॉडी ज्वेलरी असंही म्हटलं जातं. या दागिन्यांप्रती लोकांचं आकर्षण वाढत चाललं आहे. काही तरी वेगळं, हटके करण्याची इच्छा असलेल्यांना या दागिन्यांची भुरळ पडत आहे. हे दागिने थोडे विचित्र वाटत असले तरी काही काळानंतर प्रत्येकाच्या अंगावर दिसू लागले तर आश्चर्य वाटायला नको.

## अनोखा मोलोसिया




जगातला सर्वात छोटा देश कोणता? इथली लोकसंख्या किती? इथले राष्ट्रपती कोण? या प्रश्नांची उत्तरं ऐकली तर तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल. खरं तर या पृथ्वीवर असलेल्या देशांची नेमकी संख्या कोणलाही सांगता येणार नाही. जगातल्या सर्वात छोट्या देशाचं नाव आहे मोसोलिया आणि इथली लोकसंख्या आहे अवघी ३३. या देशात फक्त ३३ लोक राहतात. म्हणजे दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंह यांच्या लग्नाला उपस्थित असलेल्या पाहुण्यांपेक्षाही या देशाची लोकसंख्या कमी आहे. भारतात तर एखाद्या कुटुंबातल्या सदस्यांची संख्याही ३३ पेक्षा जास्त असू शकते. हा देश अमेरिकेतल्या नेवाडा प्रांताच्या जवळ आहे. अर्थात या देशाला अद्याप अधिकृत मान्यता मिळालेली नाही. मोसोलियाच्या निर्मितीची कथा अनोखी आहे. १९७७ मध्ये केविन बॉघ आणि त्यांच्या एका मित्राला अमेरिकेपासून फुटून वेगळं राष्ट्र असावं असं वाटलं. त्यांच्या डोक्यात हा विचार आला. त्यानंतर या दोघांनी मिळून मोसोलिया या देशाचा पाया रचला. केविन बॉघच या देशाचा राष्ट्रपती आहे. इथे राहणारे बहुसंख्य लोक केविनचेच नातेवाईक आहेत. या देशात विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. इथला कायदा, परंपरा आणि चलनही इतर देशांपेक्षा वेगळं आहे. इथे पर्यटक मोठ्या संख्येने येतात. इथे आलेल्या पर्यटकांना पासपोर्टवर स्टॅंप मारून घ्यावा लागतो. या देशाचे राष्ट्रपती म्हणजे केविन बॉघ कोणत्याही सुरक्षेशिवाय रस्त्यावर एकटे फिरतात. इतकंच नाही, तर इथे येणाऱ्या पर्यटकांना ते आपल्या देशाची माहिती देतात. त्यांच्यासोबत फिरतात. इथे येणाऱ्या पर्यटकांना मोसोलियन बँकेत जाऊन चलन बदलून घ्यावं लागतं. वालोरा हे इथलं चलन आहे. या देशात पोस्ट ऑफिसही आहे.

## गावात तीस वर्षांनी जन्मली मुलगी!




पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांचा छोटा देश इटलीतील एक घटना सध्या जगभरात चर्चेत आहे. अब्रुजो क्षेत्रातील या जुन्या गावात एक आनंदाची गोष्ट घडली आहे. या गावाचे नाव पाग्लियारा देई मार्सी असं आहे. या गावात जवळपास ३० वर्षांनंतर मुलीचा जन्म झाला आहे. मार्च २०२५ मध्ये जन्माला आलेली लारा बुस्सी त्राबुक्को ही या गावातील जवळपास तीन दशकानंतरची पहिली मुलगी आहे. जंगल आणि डोंगराने वेढलेल्या या छोट्या गावात अनेक वर्षांनंतर मुलीची किंकाळी ऐकू आली. या गावात सातत्याने जन्मदर घसरत आहे. या गावात मनुष्यापेक्षा मांजरांची संख्या अधिक आहे. येथील अनेक घरं ओसाड पडली आहेत.

लाराचे जन्म गाव पाग्लियारा देई मार्सी मध्ये एकूण लोकसंख्या अवघी २० इतकी आहे. गावातील चर्चमध्ये या मुलीचं नाव ठेवण्यात आलं. या नामकरण सोहळ्यात संपूर्ण गाव सहभागी झालं. या मुलीच्या आवाजामुळे गावात जणू चैतन्य आलं आहे. या गावाच्या आसपासच्या गावातही आनंदाची लहर आली आहे. पाग्लियारा देई मार्सी या गावातील जन्म दर सातत्याने घसरत आहे, तर अनेक जणांनी गाव सोडल्याने हे गाव ओसाड आणि भकास झाले आहे; पण या मुलीच्या जन्मदराने इटलीत आनंदोत्सव साजरा झाला.

**इटलीत लोकसंख्येचे मोठे संकट**

इटलीत लोकसंख्येचे संकट गंभीर झाले त्याच काळात लाराचा जन्म झाला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये देशाचा जन्मदर सर्वात निचांकी स्तरावर होता. त्या वर्षात या देशात केवळ ३.७ लाख मुलांचा जन्म झाला होता. एक महिला सरासरी १.१८ मुलं जन्माला घालत आहे. हा युरोपमधील सर्वात कमी जन्मदर मानला जात आहे. २०२५ च्या सुरुवातीला तर ही स्थिती अधिक गंभीर झाली. त्यामुळे या मुलीचा जन्म चर्चेचा विषय ठरला आहे.

## कंबोडियातला जल महोत्सव



कंबोडियामध्ये जलउत्सव साजरा केला जातो. जल उत्सव हा इथला पारंपरिक महोत्सव आहे. या उत्सवाच्या निमित्ताने कंबोडियाचे लोक चंद्राप्रती कृतज्ञता व्यक्त करतात. कंबोडिया हा अनोखा देश आहे. इथे अंगकोर वॅट नावाचं जगप्रसिद्ध मंदिर आहे. या देशात निसर्गसौंदर्य आहे. इतकंच नाही, तर इथल्या प्रथा-परंपराही अनोख्या आहेत. इथल्या जलमहोत्सवात नौकानयनाचं आयोजन केलं जातं. इतकंच नाही, तर नौकेत बहारदार नृत्यही सादर केलं जातं. या नृत्याचं दृश्य डोळ्यांमध्ये साठवून घेण्यासारखं असतं. या महोत्सवाला कंबोडियात 'बॉन ओम टॉक' किंवा कंबोडियन वॉटर फेस्टिवल असं म्हटलं जातं. हा महोत्सव नोव्हेंबरमध्ये साजरा केला जातो.

कंबोडियात तीन दिवस बॉन ओम टॉकची धूम असते. बाराव्या शतकात अंगकोरचा राजा जयवर्मन सप्तमच्या काळात हा महोत्सव सर्वप्रथम साजरा करण्यात आला होता. या राजाच्या सेनेने कंबोडियातल्या मच्छीमारांना मदत केली होती. या महोत्सवाच्या आयोजनामुळे देवी-देवता खूश होतात आणि त्या वर्षी तांदळाचं पीक भरपूर येतं तसंच माश्याचं भरपूर उत्पादन मिळतं, असं मानलं जातं. प्राचीन काळात राजे-महाराजे आपल्या नौदलाची ताकद आजमावण्यासाठी अशा महोत्सवांचं आयोजन करत असत, असंही म्हटलं जातं. या उत्सवानिमित्ताने होड्यांच्या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. चंद्राला नमन केलं जातं. केळं आणि नारळाच्या दुधाचा वापर करून बनवण्यात आलेला विशिष्ट प्रकारचा भाताचा पदार्थ इथे बनवला जातो.

## हडप्पा संस्कृतीच्या ऱ्हासाचं कारण...

अतिशय प्राचीन आणि मानवी इतिहासात आधुनिकीकरणाच्या दिशेनं पावलं टाकणाऱ्या प्रयत्नांचे सबळ पुरावे देणाऱ्या अशा प्राचीन सिंधू संस्कृती किंव हडप्पा संस्कृतीसंदर्भात एक अतिशय रंजक आणि तितकीच भुवया उंचावणारी माहिती नुकतीच समोर आली आहे. सध्याचं पाकिस्तान आणि उत्तर पश्चिम भारतातील बहुतांश भागांमध्ये या संस्कृतीचा उदय झाला होता. यामध्ये सुनियोजित शहर, जाळीदार रस्ते, विटांची बहुमजली घरं, शौचालय व्यवस्था आणि शहरातील सांडपाण्याचं नियोजन याचे पुरावे भारावणारे आहेत; मात्र या संस्कृतीचा ऱ्हास नेमका कसा झाला, याविषयी सध्याच्या घडीला काही मतमतांतरं आहेत.

अनेक विनाशकारी कारणांमुळं या संस्कृतीचा ऱ्हास झाला असं म्हटलं गेलं, मात्र नुकत्याच झालेल्या एका अतिशय महत्वाच्या निरीक्षणपर अध्ययनातून प्रत्यक्षात या संस्कृतीचा ऱ्हास दीर्घकाळ चाललेला सातत्यपूर्ण दुष्काळ आणि तत्सम कारणांमुळे झाल्याची बाब अधोरेखित करण्यात आली. आंतरराष्ट्रीय स्तरावरील एका संशोधन पथकानं 'कम्युनिकेशन अर्थ अँड एनवायन्मैंमेंट जर्नल'मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या अहवालातील माहितीनुसार त्यांनी साधारण इसवीसन पूर्व ३००० ते १००० पर्यंतच्या हवामान बदलांचं निरीक्षण केलं. ज्यासाठी पुराजलवायू माहिती आणि संगणकीय तंत्रज्ञानाचा यात वापर करण्यात आला.

सिंधू खोऱ्यातील सर्वात महत्त्वाच्या शहरी केंद्रांपैकी एक असणाऱ्या हडप्पा संस्कृतीचा सर्वनाश हा कोणा एका आपत्तीसम घटनेनं झाला नसून, दीर्घकाळासाठी किंवा शतकानुशतकं इथं पडलेल्या दुष्काळांच्या शृंखलेमुळं झाल्याचं कळलं. अनेक शतकांपर्यंत इथं कमी काळाच्या फरकानं सातत्यानं दुष्काळ पडत गेला आणि त्यामुळं या क्षेत्रातील नद्याची पात्र कोरडीठाक पडू लागली. माती कोरडी होत तिच्यातील पाणी धरून ठेवण्याची क्षमतासुद्धा नाहीशी होत गेली. भारतीय प्रौद्योगिकी संस्थानचे प्रमुख हिरेन सोलंकी यांच्या माहितीनुसार वारंवारच्या दुष्काळांनं हडप्पावासियांना चांगल्या जीवनशैलीसाठी इथून पलायन करण्यास भाग पाडलं. इतकंच नव्हे, तर सोलंकी यांच्यासोबतचे लेखक आणि कोलोरॅडो बोल्डर विद्यापीठातील संशोधक बालाजी राजगोपालन यांनीसुद्धा दुष्काळ हेच हडप्पाच्या ऱ्हासाचं कारण असल्याचं सांगितलं. दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळं हडप्पावासियांची अन्नान्न दशा झाली, त्यात कमकुवत शासन संरचनेमुळं परिस्थिती आणखी बिघडली आणि पाहता पाहता विनाशाच्या खोल दरीत याच परिस्थितीनं हडप्पा संस्कृतीला ढकललं जी पुन्हा कधीच वर येऊ शकली नाही.



**तेव्हापासून पर्यावरणाच्या समस्या गंभीरच!**

संशोधनातून समोर आलेल्या माहितीनुसार दुष्काळाच्या कालावधीत सिंधू संस्कृतीतील मानवानं दीर्घकाळ या संघर्षाचा सामना केला. ज्यामध्ये त्यांनी शेतीच्या पद्धतींमध्येही बदल करत व्यापाराची तंत्रसुद्धा बदलली. इतकंच नव्हे, तर हडप्पावासियांनी जलस्त्रोतांच्या आजूबाजूला आपली वस्ती वसवली आणि तिथं वास्तव्य सुरू केलं. यामध्ये सिंधू नदीसह तिच्या उपनद्यांचा समावेश होता. ३००० ते २४७५ इस. पूर्व काळादरम्यान पॅसिफिक महासागरावरील उष्णकटिबंधीय क्षेत्रामुळं मान्सूननं पूर्ण भागावरच पावसाचं प्रमाण वाढवलं. त्यामुळं आजच्या तुलनेत प्रचंड आर्द्रता आणि ला नीनासारख्या स्थितीसुद्धा तेव्हा उत्पन्न झाल्या होत्या, मात्र उष्णकटिबंधीय पॅसिफिक महासागराचं तापमान वाढू लागलं तशी या क्षेत्रातील स्थिती बिघडली, पाऊस कमी झाला आणि तापमानवाढीनं या संस्कृतीचा हळुहळू विनाश केला.



## नववधू करतेय संगणकावर काम!

'सोशल मीडिया'वर एक फोटो प्रचंड व्हायरल झाला आहे. त्यात एक नववधू लाल रंगाच्या वेशात हातात लॅपटॉप घेऊन काम करताना दिसत आहे. तिच्या शेजारीच तिचा नवरा बसलेला दिसत आहे. नववधुच्या भावाने आणि 'कोयल एआय' च्या 'सीईओ' मेहुल अग्रवाले एक्स वर शेअर केला आहे. भावाने सांगितलं, की लग्नाच्या विधीदरम्यानच ऑफिसच्या सॉफ्टवेअरमध्ये बग आला. तो त्याची बहिण आणि कंपनीच्या को-फाऊंडर गौरी अग्रवालने ठीक केलं आहे. लग्नाच्या विधीदरम्यानच बहिण अशा स्थितीत दिसली.

या पोस्टवरुन सोशल मीडियावर वाद सुरू झाला आहे. लोकांचं असं म्हणणं आहे, की एका बाजूला भारतात 'राइट टू डिस्कनेक्ट'वर चर्चा सुरू आहे. ज्यामध्ये कर्मचाऱ्यांना कायद्यानुसार हक्क असावा, की ऑफिसची वेळ संपल्यावर काम करावा लागू नये. तसेच त्यांच्या खासगी गोष्टींत दखल दिली जाऊ नये. असे लोक 'टॉक्सिक वर्क कल्चर'ला प्रोत्साहन देतात. यावर अनेकांनी कमेंट केली आहे. एकाचं म्हणणं आहे की, लोक दिखावा अतिशय छान करतात. तसेच आपल्या कामाप्रती समर्पण असणं योग्य आहे पण दिखावा नसावा, अशा कमेंट पाहायला मिळत आहे.

मेहुलने या सगळ्यावर भाष्य केलं आहे, की लोकांना 'स्टार्टअप' खूप रोमॅंटिक वाटतं. ही माझी बहिण आणि को फाऊंडर गौरी अग्रवाल आहे. जी आपल्या लग्नानंतर अगदी १० मिनिटांनी 'कोयल एआय'च्या एका बगला ठीक करण्यासाठी लॅपटॉप उघडून बसली. हा फोटो कोणतंही प्रमोशन नाही. आमचे पालकदेखील या प्रकारानंतर नाराज झाले. अनेक लोक विचारतात, की आपण का जगतो. तर त्यावर मी हा फोटो 'सोशल मीडिया'वर शेअर करतो.

**'कोयल एआय' बद्दल**

'कोयल एआय' हा एक प्रगत भारतीय 'जनरेटिव्ह एआय'प्लेटफॉर्म आहे. तो केवळ ऑडिओ किंवा स्क्रिप्टवरून चित्रपट किंवा सिनेमॅटिक व्हिडिओ तयार करण्यास मदत करतो. मेहुल आणि गौरी अग्रवाल या भावंडांनी (कार्नेगी मेलन आणि एमआयटीचे माजी विद्यार्थी) हे स्टार्टअप सुरू केले आहे.

## रेल्वे स्टेशनला नावच नाही!

भारतीय रेल्वे हा देशात फिरण्याचा सोपा, सुरक्षित आणि स्वस्त पर्याय आहे. भारतीय लोक दूरच्या प्रवासासाठी रेल्वेने जाणे पसंत करतात. देशात रेल्वेची हजारो स्टेशन्स आहेत. प्रत्येक रेल्वे स्टेशनचे नाव दर्शनी भागात आपल्याला दिसते. त्याआधारे त्या रेल्वे स्टेशनची, गावाची ओळख आपल्या होते, पण देशात एक रेल्वे स्टेशन असे आहे, ज्याचे नावच नाही. या रेल्वेस्टेशनवर नामफलक आहे, पण त्यावर त्या गावाचे नावच नाही. रेल्वे स्टेशच्या त्या पिवळ्या पाटीवर काहीच नाव नाही.



२००८ मध्ये या ठिकाणी रेल्वेने नवीनच एक स्टेशन उभारले. हे स्टेशन रैना आणि रैनागड या दोन गावांच्या मध्यभागी पडते. रेल्वेने सुरुवातीला याचे नाव अगोदर रैनागड असे ठेवले. पिवळ्या पाटीवर रैनागड असे लिहिले गेले. रैनागडचे लोक यामुळे आनंदीत झाले, पण रैना गावाच्या लोकांना ही बाब काही पटली नाही. त्यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली. या दोन्ही गावात कडाक्याचे भांडण झाले. रैना गावातील लोकांनी या पाटीवर रैना गावाचे नाव देण्याची मागणी केली. दोन्ही गावातील मंडळींनी आंदोलन केले. रेल्वे स्टेशन आणि वरिष्ठ कार्यालयाबाहेर धरणे धरले. इतकेच काय थेट कोर्टात झगडा पोहचला. याचा रेल्वेच्या अधिकाऱ्यांना चांगला ताप झाला. रोजच यावरून वाद सुरू होता. मग रेल्वेने दोन्ही गावकऱ्यांना तोडगा काढण्यास सुचवले, पण उपयोग झाला नाही. मग रेल्वेने पिवळ्या बोर्डावरील नाव हटवले आणि परत या स्टेशनला नावच दिले नाही. गेल्या १७ वर्षांहून अधिक काळापासून या बोर्डावर कोणत्याच गावाचे नाव लिहिले गेले नाही. इथे केवळ पिवळी पाटी आहे.

**तिकीट काऊंटर पण पाटी नाही**

अर्थात पिवळ्या पाटीवर नाव नसले तरी येथे रेल्वे थांबतात. लोकल पॅसेंजर दिवसात ६ वेळा धावते. प्रवासी चढउतार होतात. तिकीटावर मात्र रैनागड असंच नाव छापून येते. विशेष म्हणजे या रेल्वे स्टेशनला रविवारी सुट्टी असते. म्हणजे रविवारी रेल्वे येथे थांबत नाही. कारण येथील स्टेशन मास्तर बर्धमान येथे जाऊन तिकिटाचा आणि पैशांचा हिशोब देतो. हे नाव नसलेले रेल्वे स्टेशन पश्चिम बंगाल राज्यात आहे. बर्धमान या शहरापासून हे रेल्वे स्टेशन जवळपास ३५ किलोमीटर दूर आहे. बांकुरा-मेसाग्राम या रेल्वे मार्गावर हे स्टेशन आहे.

## २२०० वर्षांपूर्वीचा रस्ता!



कधीकधी पुरातत्वशास्त्राच्या जगात लागलेले शोध आपल्याला प्राचीन संस्कृती किती पुढे होत्या, यावर विचार करायला भाग पाडतात. चीनमध्ये अलिकडेच जमिनीखाली गाडलेल्या एका प्राचीन रस्त्याने इतिहासाचा एक अध्याय पुन्हा उलगडला आहे. चीनी पुरातत्वशास्त्रज्ञांनी सुमारे २,२०० वर्षांपूर्वीच्या एका मोठ्या रस्त्याचा एक नवीन भाग शोधला आहे. 'चीन स्ट्रेट रोड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या रस्त्याला प्राचीन जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी एक मानले जाते. त्याची रचना आणि प्रमाण यांची आधुनिक महामार्गांशी तुलना केली जात आहे. चीनमधील शांक्सी प्रांतातील युलिन शहरात हा शोध लागला.

सांस्कृतिक वारसा संवर्धन आणि संशोधन संस्थेच्या एका पथकाने उत्खननादरम्यान या ऐतिहासिक रस्त्याचा सुमारे १३ किलोमीटर लांबीचा भाग शोधून काढला. हा रस्ता एकेकाळी चीनच्या पहिल्या साम्राज्याच्या केंद्राला त्याच्या उत्तर सीमांशी जोडत होता. प्राचीन ऐतिहासिक कागदपत्रांनुसार, संपूर्ण मार्ग अंदाजे ९०० किलोमीटर लांब होता आणि तो उत्तर चीनच्या मोठ्या भागातून जात होता. हा रस्ता चीनचा पहिला सम्राट किन शी हुआंग यांच्या आदेशाने बांधण्यात आला होता. सर्वात आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे जेव्हा जगातील अनेक भागांमध्ये केवळ मातीचे रस्ते होते तेव्हा इतका विस्तीर्ण आणि सरळ रस्ता कोणत्याही आधुनिक यंत्रसामग्रीशिवाय अवघ्या पाच वर्षांत पूर्ण झाला. या रस्त्याचा मुख्य उद्देश राजधानी शियानयांगला आधुनिक काळातील अंतर्गत मंगोलियातील जियुआनशी जोडणे हा होता.

हा साधा रस्ता नव्हता, तर एक मोक्याचा लष्करी मार्ग होता. सीमावर्ती भागात सैन्य आणि आवश्यक वस्तूंची जलद वाहतूक करण्यासाठी याचा वापर केला जात असे. त्या वेळी चीनच्या उत्तरेकडील सीमेसाठी एक महत्त्वाचा धोका निर्माण करणाऱ्या भटक्या जमाती झिओनग्नूच्या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी हा विशेषतः बांधण्यात आला होता. उत्खननादरम्यान उघड झालेल्या रस्त्याच्या रचनेमुळे शास्त्रज्ञ आणि अभियंते खूप प्रभावित झाले आहेत. त्या काळातील अभियंत्यांनी पर्वत खोदून खोल दऱ्या भरून जवळजवळ पूर्णपणे सरळ मार्ग तयार केला. रस्त्याची सरासरी रुंदी अंदाजे ४० मीटर होती, जी आधुनिक काळातील चार-लेन महामार्गाइतकी होती. काही ठिकाणी, ती ६० मीटरपर्यंत पोहोचली. रस्त्याची टिकाऊपणा सुनिश्चित करण्यासाठी, रॅम्ड अर्थ तंत्र वापरले गेले. यात मातीच्या थरांवर कॉम्पॅक्शन वापरून एक अत्यंत मजबूत पाया तयार केला जातो. याव्यतिरिक्त, रस्त्याचे दीर्घायुष्य सुनिश्चित करण्यासाठी उतार आणि ड्रेनेजदेखील प्रदान केले गेले.

# नव्या पिढीने आम्हाला निवृत्त करायले हवे!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांचे वक्तव्य नेहमीच अनेकांना बुचकळ्यात टाकणारे असते. अनेकदा त्यांच्या वक्तव्यातून त्यांच्या निवृत्तीचे संकेत निघतात. परंतु नंतर ते काळाच्या ओघात मागे पडतात. लोकसभा निवडणुकीपूर्वीही वनराई फाउंडेशनच्या कार्यक्रमात त्यांनी पटलं तर मत द्या, नाहीतर नका देऊ, मी आता फार लोणी लावायला तयार नाही, मी नाही तर माझ्या जागी दुसरा कोणीतरी येईल, अशा भावना व्यक्त केल्या होत्या.

आज रविवारी त्यांनी खासदार औद्योगिक महोत्सवानिमित्त अ‍ॅडव्हॉटेज विदर्भच्या पत्रकार परिषदेत माहिती देताना उद्योग क्षेत्रात नवीन पिढी आता पुढे येत आहे. नव्या पिढीने आम्हाला निवृत्त करायला हवे, असे नमुद केले. मात्र या वक्तव्यानंतर लगेच ते विदभार्तील औद्योगिकीकरण, कृषी व्यवसाय, सेवा क्षेत्र, पर्यटनातून रोजगाराच्या संधी आदीवर बोलते झाले.



नागपुरात ६ ते ८ फेब्रुवारीदरम्यान खासदार औद्योगिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत माहिती देण्यासाठी असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलमेंटतर्फे पत्रकारपरिषद आयोजित करण्यात आली. त्यात ते बोलत होते. यावेळी त्यांनी विदभार्तील उद्योग, सेवा क्षेत्रांतर्गत पर्यटन, कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नासह भविष्यातील नियोजनाचीही माहिती दिली.

ते म्हणाले, गडचिरोली जिल्ह्यात आयएनओ-६५ दर्जाचे उत्तम खनिज असून स्टील हब तयार करण्याच्या सुरुवातीच्या प्रयत्नावक कुणाचाही विश्वास नव्हता. परंतु आज या क्षेत्रात ७.५ लाख कोटींची गुंतवणूक झाली आहे. गडचिरोलीच नव्हे चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, नागपूरही स्टिल उद्योगाचे नवे केंद्र ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

स्टिल इंडस्ट्रिज उद्योग आल्यास मॅगनीज, उजार्ही वाढले. ही एका यशोगाथेची सुरुवात असल्याचे त्यांनी नमुद केले. नागपूर स्मार्ट सिटी कार्यालयात कौशल्य विकासासाठी प्रयत्न होत असून यातून रोजगारनिर्मिती होणार असल्याचे ते म्हणाले.

सेवा क्षेत्रामध्ये पर्यटन महत्वाचे असून विदर्भात अभयारण्य, व्याघ्र प्रकल्प पर्यटनाचे मोठे क्षेत्र आहे. यात हॉटिल व्यवसायातून रोजगाराला संधी आहे. याशिवाय साहसी खेळांनाही प्राधान्य दिले जाणार आहे. यासाठी आंभोऱ्यात एअर स्ट्रिप (विमान उड्डाणांसाठी लहान धावपट्टी) तयार केली जाईल.

यावरून हेलिकॉप्टर उड्डाण घेईल. हेलिकॉप्टरमधून डायव्हिंग करता येईल. आंभोऱ्यात साहस खेळांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. साहसी खेळाच्या आकर्षणातून येथील २००० लोकांना रोजगार मिळेल, असे त्यांनी सांगितले. याशिवाय वर्धा मार्गावर बर्ड पार्कमध्येही साहसी खेळ प्रकाराला प्राधान्य देण्यात येणार असून येथे ७०० ते ८०० लोकांना रोजगार मिळेल, असा दावा त्यांनी केला.

## जिन्ना-हिंदू महासभेची इतिहासात युती

### हर्षवर्धन सपकाळ यांची सडकून टीका

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १८ :



महाराष्ट्रात भाजप आणि एमआयएम हे दोन जातीयवादी विचारांचे पक्ष आहे. हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यांची दोघांची युती आहे. एमआयएम आणि भाजप हे महाराष्ट्र धमार्साठी बाधक आहेत, त्यांनी फिक्स करत ही निवडणूक लढवली, यामुळे त्यांच्या दोघांची ताकद वाढलेली आहे, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. जिन्ना आणि हिंदू महासभेची युती होती. बंगालमध्ये मुस्लीम लीगचा मुख्यमंत्री, तर जनसंघाचे मुखर्जी हे उपमुख्यमंत्री होते. ही दोघांची नैसर्गिक युती आहे, जी या निवडणुकीत समोर आली.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, महाराष्ट्रातील जनता जर वेळीच सावध झाली नाही तर ही लोकं राज्याचे वाटोळे केल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे औवेसी(एमआयएम) आणि देवेंद्र फडणवीस(भाजप) यांची जी मैत्री आहे एकाच विचाराने ते दोघे पुढे वाटचाल करत आहेत, हे आपण ओळखले पाहिजे. हा काय नवीन विषय नाही.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, काँग्रेस आणि शिवसेना गेली अनेक वर्षे मुंबई मनपा एकमेकांच्या विरोधात लढत आहे. मुंबईमध्ये काँग्रेसने वंचितसोबत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता.आमच्यावर होणारी टीका ही चुकीची आहे. वंचित आघाडीच्या नेत्यांची भावना आम्ही जाणून घेणार आहोत. वंचितचा एकही उमेदवार निवडून आलेला नाही. पण जय-पराजय नाही तर आमच्यासाठी विचारांचा मेळ आहे. आम्ही गांधी यांच्या विचाराने चालणारे असल्याचे सपकाळ यावेळी म्हणाले.

भाई जगताप यांनी वर्षा गायकवाड यांच्याबद्दल केलेले वक्तव्य हे पक्षांतर्गत आहे त्यावर कारवाई सुरू आहे. भाई जगताप यांनी वर्षा गायकवाड यांच्यातील अंतर्गत संघर्षावर लवकरच समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

# छांगूर बाबाचा सहकारी नागपुरातून अटकेत

## धर्मांतरण प्रकरणात यूपी एटीएसची कारवाई

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

उत्तर प्रदेश एटीएस पथकाने स्थानिक एटीएस व पाचपावली पोलिसांच्या मदतीने शनिवारी पहाटे आसीनगर परिसरात संयुक्त कारवाई करत धर्मांतरण व इतर गंभीर प्रकरणांतील फरार आरोपीला अटक केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपीला ट्रांझिट रिमांडवर उत्तर प्रदेशातील लखनौ येथे नेण्यात आले आहे. तो दीर्घकाळापासून फरार होता. अखेर गुप्त माहितीच्या आधारे त्याला अटक करण्यात यश आले. इधू इस्लाम गुलाम याजदानी (४०) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

इधू आसीनगर परिसरातील एका धार्मिक स्थळाजवळ वास्तव्यास होता. उत्तर प्रदेशमध्ये त्याच्याविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, लखनौ येथील संबंधित न्यायालयाने त्याच्याविरुद्ध अटक वॉरंट जारी केले होते. धर्मांतरणासाठी बेकायदेशीररीत्या निधी उभारणे तसेच संशयास्पद कारवायांमध्ये सहभाग असल्याचा आरोप त्याच्यावर आहे.

तो छांगूर बाबा प्रकरणातील आरोपींचा सहकारी असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे सहआरोपी म्हणून त्याच्याविरुद्धही गुन्हा नोंदवण्यात आला आहे. अटकेच्या भीतीने इधू इस्लाम उत्तर प्रदेशातून नागपूरला पळून आला होता. मागील सुमारे दोन वर्षांपासून तो फरार होता. नाव व पत्ता बदलून तो राहत होता. त्याला अटक करण्यासाठी पोलिसांनी विविध ठिकाणी शोधमोहीम राबवली होती, मात्र यश मिळाले नव्हते.

दरम्यान, गुप्तचर यंत्रणेला तो नागपूरमध्ये लपून बसल्याची माहिती मिळाली. त्यानंतर स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत होते. संशयास्पद हालचालींमुळे तो छांगूर बाबाचा सहकारी असल्याची खात्री झाली. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी रात्री उत्तर प्रदेश एटीएसचे पथक नागपुरात दाखल झाले. शनिवारी पहाटे सुमारे ५ वाजता स्थानिक एटीएस व पाचपावली पोलिसांच्या मदतीने आसीनगरातील धार्मिक स्थळाजवळील अरुंद गल्लीतील त्याच्या निवासस्थानी छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान त्याला अटक करून पुढील तपासासाठी लखनौ येथे नेण्यात आले आहे.

**उपराजधानीतही झाले होते धर्मांतर शिबिर**

छांगूर बाबाने १५०० हून अधिक हिंदू मुलींचे बेकायदेशीरपणे धर्मांतर केल्याचे समोर आले होते. त्या आधारे दहशतवाद विरोधी पथक बेकायदेशीर धर्मांतराला बळी पडलेल्यांचा पीडितांचा शोध घेत आहे. छांगूर बाबाने उत्तर प्रदेशातील बलरामपूर येथे येण्यापूर्वी महाराष्ट्रापासून ते दुबईपर्यंत नेटवर्क तयार केले होते. त्याने महाराष्ट्रातही मोठ्या संख्येने धर्मांतर केल्याचे समोर आले आहे. छांगूर बाबाचे नातेवाईक आणि अनुयायी हिंदूंना इस्लाम धर्म स्वीकारण्यास प्रवृत्त करण्यासाठी कार्यक्रम घ्यायचे. असाच एक कार्यक्रम नागपुरातही झाल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. त्यानंतर एटीएसच्या पथकाने शुक्रवारी शोध मोहीम राबवत इधू इस्लाम याला ताब्यात घेतले.

छांगूर बाबा मुंबईतील एका दर्गाह समोर अंगठ्या विकायचा. अल्पावधीतच तो आखाती देशांतील हिंदूंचे इस्लामीकरण करणाऱ्या संस्थांच्या संपर्कात आला. त्यानंतर छांगूरबाबाने बलरामपूरमध्ये बेकायदेशीरपणे धर्म परिवर्तनाला सुरुवात केली.

## पत्रकार भवन ट्रस्ट अध्यक्षपदी प्रदीप कुमार मैत्र

### सचिवपदी शिरीष बोरकर तर कोषाध्यक्षपदी ब्रम्हाशंकर त्रिपाठी







■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

टिळक पत्रकार भवन ट्रस्टच्या संचालक पदाची निवडणूक नुकतीच पार पडली. या संचालक मंडळातून अध्यक्षपदी प्रदीपकुमार मैत्र यांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच सरचिटणीसपदी शिरीष बोरकर यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी प्रभाकर दुपारे तर कोषाध्यक्षपदी ब्रह्माशंकर त्रिपाठी सहसचिवपदी विवेक पुराडभट यांची निवड करण्यात आली.

संचालक मंडळात सदस्यपदी विनोद देशमुख, जोसेफ राव, विश्वास इंदूरकर, संजीब गांगुली, महेश उपदेव, भूपेंद्र गणवीर, महेंद्र आकांत यांची निवड करण्यात आली असून नामनियुक्त सदस्य म्हणून धर्मेंद्र जोरे यांची निवड करण्यात आली. आणि विशेष आमंत्रित म्हणून सुनील तिवारी आणि मनिष सोनी यांची पण निवड केली आहे. या कार्यकारणीचा कार्यकाळ सहा वर्षाचा राहील.

## पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनचा निधी उभारण्यासाठी भांडवली बाजारात प्रवेश




पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड, एक सार्वजनिक वित्तीय संस्था आणि ऊर्जा क्षेत्रावर लक्ष केंद्रित करणारी शेड्यूल-ए महारत्न केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीने प्रत्येकी १,००० रुपये दर्शनी मूल्याच्या (झिरो कूपन एनसीडीच्या बाबतीत, दर्शनी मूल्य प्रत्येकी १,००,००० असेल) सुरक्षित, रेटेड, सूचीबद्ध, परत करण्यायोग्य, नॉन-कन्व्हर्टिबल डिबेंचर्सच्या सार्वजनिक इश्यूपेक्षासाठी ९ जानेवारी, २०२६ रोजीचा ट्रँच क प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे.

मूळ इश्यूचा आकार ५०० कोटी रुपये आहे, ज्यामध्ये ४,५०० कोटी रुपयांपर्यंतच्या ग्रीन शू पर्यायासह एकूण ५,००० कोटी रुपये जमा होतील.

५,००० कोटी रुपयांचा जो १०,००० कोटी रुपयांच्या शेल्फ मयार्देमध्ये आहे.पहिला टप्पा इश्यू शुक्रवार, १६ जानेवारी, २०२६ रोजी उघडेल आणि शुक्रवार, ३० जानेवारी, २०२६ रोजी बंद होईल, ज्यामध्ये भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ (सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया) (नॉन-कन्व्हर्टिबल सिक्युरिटीज) नियमन २०२१, सुधारित नुसार लवकर बंद करण्याचा किंवा मुदतवाढ देण्याचा पर्याय असेल.

हे एनसीडी नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) वर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे, ज्यामध्ये एनएसई या इश्यूसाठी नियुक्त स्टॉक एक्सचेंज असेल.

■ ■ ■

### भाजप नेते भूषण शिंगणे मारहाण प्रकरण

# आठ जणांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

महापालिका निवडणुकीचा कौल हाती पडताच प्रभाग ११ मधील भाजपचे उमेदवार व माजी नगरसेवक भूषण शिंगणे यांच्यासंदर्भात मोठी बातमी समोर येत आहे. मतदानाच्या आदल्या रात्री बुधवारी मध्यरात्री शिंगणे यांना मारहाण झाली होती. गोरेवाडा परिसरात शिंगणे हे कार्यकर्त्यांशी चर्चा करत असताना ते पैसे वाटत असल्याचा आरोप करत ५० ते ६० जणांनी शिंगणे यांच्यावर हल्ला केला होता. यात शिंगणे यांच्या हाताला आणि ओठाला मार लागला.



या मारहाणीनंतर भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी हा हल्ला राजकीय सुडबुद्धीतून झाल्याचे सांगत राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली होती.

दरम्यान मुख्यमंत्री फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी स्वतः शिंगणे यांच्या घरी भेट देऊन त्यांची विचारपूस केली होती. त्यानंतर गोरेवाडा भागात पैशांचे वाटप होत असल्याच्या संशयावरून शिंगणे यांच्यावर हा हल्ला झाला होता. दरम्यान भाजपाचे शहराध्यक्ष तिवारी यांनी पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल यांची भेट घेऊन रीतसर कायदेशीर कारवाईची मागणी केली होती.

शिंगणे यांच्यावर हल्ला करणाऱ्या ८ जणांना गिट्टीखदान पोलिसांनी शनिवारी रात्री अटक केली. गणेश उर्फ घुई आनंदराव चाचेकर(४०), मंगेश रमेश मांगे (३९), नितीन कृष्णाजी बगडे (४०), अमित विजय मेश्राम (३४), आशिष नामदेव भड (४१), अंकुश विजय कोचे (३०), रोशन दिलीप परतेकी (३४), राहूल निर्भय अठरोकार (२५) अशी गिट्टीखदान पोलिसांनी मारहाण प्रकरणात अटक केलेल्या ८ जणांची नावे आहेत. गुट्टीखदान पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलाश देशमाने यांनी या अटकेला दुजोरा दिला.

## खंडणी प्रकरणातील फरार आरोपी बोमा पोलिसांच्या जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १८ :

गुन्हे शाखा पोलीस उपायुक्तांशी घेतलेला पंगा आणि मद्यालय नर्तिकेच्या विनयभंग गुन्ह्यात फरार सट्टा बुकी आशीष कुबडे उर्फ बोमा अखेर शनिवारी रात्री पोलिसांच्या जाळ्यात अडकला. रस्त्यावरून जाणाऱ्या पोलिसांना तो एका कारमध्ये बसल्याचे दिसल्यानंतर पथकाने पाठलाग करत त्याला बेड्या ठोकल्या.

बोमाने एका व्यावसायिकाकडून २० लाख रुपये खंडणी मागितली होती. नंतर मद्यालयातील एका नर्तकेचे त्याने विनयभंग केला. इतक्यावरच तो थांबला नाही तर बोमाने गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त राहूल माकणीकर यांना भ्रमणदूरध्वनीवरून आक्षेपार्ह विधान केले होते. मधल्या काळात त्याने या कृत्याची याचना करणारी चित्रफितही समाजमाध्यमांवर व्हायरल केली होती.

दरम्यान गुन्हे शाखेच्या रडारवर आल्यानंतर गुन्हा दाखल होताच बोमा शहरातून पळून गेला. सदर आणि एमआयडीसी पोलिस तसेच गुन्हे शाखा त्याच्या मागावर होते. परंतु तो सापडत नव्हता. शनिवारी संध्याकाळी पोलीस उपायुक्त ३ राहुल मदने यांचे पथक गंजीपेठ परिसरातून येत होते. या पथकाला बोमा एका कारमध्ये बसल्याचे दिसले. तो एका नातेवाईकाला भेटायला आला आहे. खात्री पटताच पथकाने परिसरात सापळा रचला. बोमा नातेवाईकाच्या घरातून निघताच पोलिसांनी त्याला अटक केली. पुढील कार्यवाहीसाठी त्याला सदर पोलिसांच्या ताब्यात दिले.

गेल्या महिन्यात सिव्हिल लाईन्स येथील रहिवासी इंद्रकुमार घिसुलाल अग्रवाल (५२) या व्यावसायिकाच्या तक्रारीवरून सदर पोलिसांनी बोमाविरुद्ध खंडणीसह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला होता. अग्रवाल कपडे आणि रिअल इस्टेट व्यवसाय करतात. बोमा हा शहरातील सर्वात चर्चित आणि वादग्रस्त बुकींपैकी एक आहे. बोमा आणि अग्रवालची भेट एका मित्रामार्फत झाली होती. गेल्या वर्षी जानेवारीत बोमाने अग्रवालकडे १ कोटी २० लाख रुपये उसणे मागितले.

पैसे देण्यास नकार दिला असता बोमाने त्याला धमकावणे सुरू केले. बोमाने अग्रवालला गोळी घालून ठार मारण्याची धमकी देऊन २० लाखांची खंडणी मागितली. सततच्या धमक्यांमुळे अग्रवालने पोलिस तक्रार दाखल केली होती.

## मलेशिया एअरलाइन्सची क्रिकेट संघ, मुंबई इंडियन्ससोबत भागीदारी



मलेशिया एअरलाइन्सने भारतातील सर्वात यशस्वी आणि सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट संघ असलेल्या मुंबई इंडियन्ससोबत एक महत्त्वपूर्ण भागीदारी केली आहे, ज्या अंतर्गत ते असोसिएट स्पॉन्सर आणि अधिकृत ग्लोबल एअरलाइन पार्टनर म्हणून काम पाहणार आहेत.

हा सहयोग प्रमुख जागतिक बाजारपेठांमध्ये खेळांच्या माध्यमातून ब्रँड आणि व्यावसायिक वाढीला गती देण्याच्या एअरलाइनच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे. ही भागीदारी मलेशिया एअरलाइन्सची भारतातील आपली उपस्थिती मजबूत करण्याच्या दीर्घकालीन वचनबद्धतेवर जोर देते, जे तिच्या सर्वात महत्त्वाच्या वाढीच्या बाजारपेठांपैकी एक आहे.

या निमित्ताने, भारतातील वार्षिक पतंग उडवण्याच्या सणांपैकी एक असलेल्या मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर, मुंबईतील जिओ वर्ल्ड गार्डन्समध्ये शंभर बुलान पतंग उडवण्यात आले, जे खेळ आणि प्रवासाद्वारे संस्कृतींच्या एकत्र येण्याचे प्रतीक आहे. या उद्घाटन समारंभात मुंबई इंडियन्सचे मुख्य प्रशिक्षक महेला जयवर्धने, तसेच क्लबचे प्रतिनिधीही उपस्थित होते.जगातील सर्वाधिक लोकप्रिय क्रिकेट संघांपैकी एक म्हणून, मुंबई इंडियन्सचा जगभरात ५५ दशलक्षाहून अधिक चाहत्यांचा चाहतावर्ग आहे, जो मलेशिया एअरलाइन्सला भारत आणि त्यापलीकडील प्रेक्षकांशी जोडण्यासाठी एक मजबूत व्यासपीठ प्रदान करतो.

■ ■ ■

## कचऱ्याची ट्रॉली अंगावर येऊन कोसळून मजुराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १८ :

कचरा उचलणाऱ्या महापालिकेच्या घंटा गाडीवर काम करत असताना दबा धरून बसलेल्या काळाने मजुरावर घाला घातला. कचरा उचलत असताना अख्खा कचऱ्याची ट्रॉली अचानक अंगावर येऊन कोसळ्याने कंत्राटी सफाई कामगार त्या खाली दबला गेला.

सिद्धार्थ घोडके (३९) असे या दुर्दैवी घटनेत दगावेल्या मजुराचे नाव आहे. महापालिकेच्या नेहरू नगर झोन अंतर्गत बुधवारी बाजार परिसरात रविवारी सकाळी सिद्धार्थ घोडके हे कर्तव्यावर होते.



महापालिकेच्या घंटा गाडीवरील मजुर कचरा उचलत असताना अख्खा डालाच्या डाला सिद्धार्थ यांच्या अंगावर येऊन कोसळला. यात अजनी परिसरातील रहिवासी सिद्धार्थ घोडके (३९) हा कंत्राटी मजुर कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबून मरण पावले.

सिद्धार्थ हे महापालिकेच्या नेहरू नगर झोन अंतर्गत ए. जी. कंपनीत सफाई कामगार म्हणून काम करत होते. ते रविवारी सकाळी इतर सहकाऱ्यांसह बुधवारी बाजार परिसरातून कचरा उचलून भांडेवाडी कचरा डंपिंग यार्डकडे जाणार होते.

कचरा उचलत असताना अख्खा डाला जवळच उभ्या असलेल्या सिद्धार्थ यांच्या अंगावर येऊन कोसळला. त्या खाली दबले गेल्याने सिद्धार्थ यांना गंभीर दुखापत झाली. इतर कर्मचाऱ्यांनी कसेबसे त्यांना बाहेर काढत मेडिकलच्या ट्रॉमा सेंटरकडे धाव घेतली. तिथे पोचताच डॉक्टरांनी मृत घोषित केले. सक्कदरा पोलिसांनी पंचनामा करत पुढील कारवाई सुरू केली.

या अपघातात दगावलेले सिद्धार्थ हे घोडके कुटुंबातले कर्ते व्यक्ती होते. त्यांचा कर्तव्यावर असताना अपघाती मृत्यू झाल्याने संतप्त झालेल्या नातेवाईकांसह अन्य मजुरांनी मृतदेहासह सक्कदरा पोलीस ठाणे गाठले. नुकसान भरपाई मिळाल्याशिवाय अंत्यसंस्कार करणार नाही, असा पवित्रा घेत नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात घोषणाबाजी केली.

## लखानी फायनान्शियल निधी उभारणी मॉडेलवर २०२६ च्या वाढीचा पाया रचणार




लखानी फायनान्शियल सर्व्हिसेस ही एक बुटीक इन्व्हेस्टमेंट बँकिंग आणि निधी उभारणी सल्लागार कंपनी आहे, तिने आज २०२६ साठी आपला व्यवसाय आराखडा जाहीर केला. या आराखड्यानुसार, कंपनीचा संरचित १२०-दिवसांचा निधी उभारणी कार्यक्रम आगामी वर्षासाठी कंपनीचे प्राथमिक वाढ आणि अंमलबजावणीचे इंजिन म्हणून काम करेल.हा आराखडा सध्याच्या खाजगी बाजाराच्या परिस्थितीच्या कंपनीच्या मूल्यांकनावर आधारित आहे, जिथे निधी उभारणीसाठी लागणारा वेळ वाढला आहे, भांडवलाचा वापर मंदावला आहे आणि गुंतवणूकदार आर्थिक स्थिती, अंमलबजावणी क्षमता आणि भांडवली कार्यक्षमतेची अधिक बारकाईने तपासणी करत आहेत. या पार्श्वभूमीवर, छत्र ने सांगितले की, ते अनिश्चित कालावधीच्या निधी उभारणी करारांऐवजी संरचित, निश्चित वेळेच्या करारांवर लक्ष केंद्रित करणार आहे.१२०-दिवसांचा निधी उभारणी कार्यक्रम हा संपूर्ण भांडवल उभारणी चक्राला समाविष्ट करणारा निश्चित कालावधीचा करार म्हणून तयार केला आहे. हा कार्यक्रम सामान्यतः २ कोटी ते २० कोटी रुपयांपर्यंत निधी उभारणाऱ्या कंपन्यांना, ज्यात सीड, प्री-सिरीज ए आणि सुरुवातीच्या सिरीज ए टप्प्यांचा समावेश आहे, त्यांना मदत करतो. ■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com